१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
NAVAKAL

• मुंबई, गुरुवार २५ जून, २०२६ • वर्ष-१०४, अंक-११२, पाने-८, किंमत: ₹ ७
• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 112 Marathi - Daily - Mumbai, 25 June, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-
• संपादक- रोहित रमाकांत पांडे 24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!
"अखेर अध्यक्षांनी व्यक्त केली दिलगिरी! काय होतं खरं कारण?"
navakal.in
@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews


मुंबईच्या दादर भागात गाडीवर झाड पडले (छाया : दिपक साळवी)

# मुंबई, पालघरला रेड अलर्ट! वाहतूक कोलमडली नालेसफाई पाण्यात! पेणच्या गणेशमूर्ती भिजल्या

**महाराष्ट्रात पंधरा दिवस उशिराने दाखल झालेल्या मोसमी पावसाने आज पहिल्याच दमदार हजेरीत मुंबई, उपनगर, ठाणे, नवी मुंबई, पालघर आणि रायगड जिल्ह्यांना झोडपून काढले. या पावसामुळे अनेक ठिकाणी घरात पाणी शिरले, रस्ते तुंबले, झाडे कोसळली, वाहतूक विस्कळीत झाली. पेण तालुक्यातील एका गणेशमूर्ती कारखान्यात पाणी शिरल्याने शेकडो गणेशमूर्तींचे नुकसान झाले. पहिल्याच पावसाने याप्रकारे नालेसफाई आणि इतर उपाययोजनांचा पूर्ण बोजवारा उडवला. मात्र सत्ताधारी आणि विरोधकांनी यावरून एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करून सर्वसामान्यांच्या प्रश्नांपेक्षा त्यांना याचे राजकारण करण्यातच रस असल्याचे दाखवून दिले.**



■ मुंबई

**कोकणच्या** सीमेवर अडकलेला मोसमी पाऊस गेल्या दोन दिवसांत वेगाने वाटचाल करत संपूर्ण राज्यात दाखल झाला आहे. भारतीय हवामान विभागाने मुंबई आणि पालघर जिल्ह्यांसाठी रेड अलर्ट जारी केला असून, पुढील तीन दिवस कोकणासह राज्यातील अनेक भागांत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. खास करून पुढील ४८ ते ७२ तास कोकण, मुंबई महानगर क्षेत्र आणि घाटमाथ्यावर अतिवृष्टीचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

गेल्या दोन दिवसांत जून महिन्याच्या सरासरी पावसाच्या तब्बल ५२ टक्के पाऊस राज्यात झाल्याचे हवामान अभ्यासक अथ्रेय शेट्टी यांनी सांगितले. विजांचा कडकडाट, ताशी ४० ते ६० किलोमीटर वेगाने वाहणारे वारे आणि जोरदार सरींमुळे आज राज्यात अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत झाले. मुंबईत काल रात्रीपासूनच पावसाची रिपरिप चालू होती. रात्री ११ ते पहाटे ३ या पाच तासांत पडलेल्या पावसामुळे मुंबईतील अनेक सखल भाग जलमय झाले. दादर, माटुंगा, सायन, कुर्ला, अंधेरी, किंग्ज सर्कल, मालाड, धारावी आणि इतर सखल भागांमध्ये पाणी साचले. दादर आणि माटुंगा रेल्वे स्थानक परिसरात रुळांवर पाणी साचल्याने मध्य आणि पश्चिम रेल्वेची वाहतूक संथ गतीने सुरू होती. त्यामुळे हजारो प्रवाशांना स्थानकांवर खोळंबून राहावे लागले. पहिल्याच पावसात अंधेरी सबवेमध्ये तीन ते चार फूट पाणी भरल्याने तो तात्पुरता वाहतुकीसाठी बंद करण्यात आला. पवई परिसरात रस्ता खचल्याची घटना घडली. किंग्ज सर्कल परिसरात मोठ्या प्रमाणावर पाणी साचल्याने ठाण्याकडे जाणारी वाहतूक मंदावली. या भागात एक बेस्ट बस बंद पडल्याने वाहतूक विस्कळीत होण्यात आणखी भर पडली. कांदिवली पूर्वेतील हनुमान नगरमधील राधाकृष्ण सोसायटीसह अनेक घरांमध्ये पाणी शिरले. दादर पूर्वेतील स्वामीनारायण मंदिराजवळ रात्री एका कारवर झाड कोसळल्याची घटना घडली. यात कारमध्ये झोपलेला चालक जखमी झाला. विक्रोळी पश्चिमेतील जेव्हीएलआर मार्गावरील सनसिटी कॉम्प्लेक्स आणि सनहाईट्स इमारतीलगत असलेली सुमारे ५० मीटर लांबीची संरक्षक भिंत रात्री दीड वाजताच्या » पान ६ वर

## इराणशी युद्ध नकोच ट्रम्प विरोधात ठराव मंजूर



**अमेरिकन संसदेचे वरिष्ठ सभागृह असलेल्या सिनेटने इराणविरोधातील युद्धाच्या विरोधातील ठराव मंजूर केला आहे. ५० विरुद्ध ४८ मतांनी मंजूर झालेल्या या ठरावात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांना इराणविरोधातील कोणतीही लष्करी कारवाई थांबवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यापूर्वी हा ठराव प्रतिनिधीगृहाने म्हणजे हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हजने देखील मंजूर केला होता.**

■ वॉशिंग्टन

**१९७३ च्या** वॉर पॉवर्स ॲक्टनंतर प्रथमच अमेरिकन काँग्रेसच्या दोन्ही सभागृहांनी कोणत्याही राष्ट्राध्यक्षांना युद्धसदृश कारवाई थांबवण्याची मागणी केली आहे. मतदानादरम्यान चार रिपब्लिकन खासदारांनीही डेमोक्रॅट सदस्यांना पाठिंबा दिला. त्यामुळे ट्रम्प यांच्या पक्षातील वाढता अंतर्गत विरोधही समोर आला आहे. मात्र, व्हाईट हाऊसने या ठरावाचा कोणताही कायदेशीर परिणाम होणार नसल्याचे स्पष्ट केले असून, अमेरिकेची लष्करी कारवाई आधीच संपुष्टात आल्याचा दावा केला आहे.

दरम्यान, अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबिओ हे संयुक्त अरब अमिरात, बहारिन आणि कुवेतच्या दौऱ्यावर पोहोचले आहेत. अमेरिका-इराण संभाव्य कराराबाबत आखाती देशांच्या चिंता दूर करणे हा त्यांच्या दौऱ्याचा मुख्य उद्देश आहे. या देशांना भीती आहे की, अशा करारामुळे होर्मुजच्या सामुद्रधुनीवरील इराणचे वर्चस्व वाढू शकते. तसेच करारात इराणच्या क्षेपणास्त्र कार्यक्रमाबाबत कोणतीही स्पष्ट अट नसल्यानेही अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या चर्चेत इराणच्या पुनर्बांधणीसाठी संभाव्य ३०० अब्ज डॉलरच्या निधीबाबतही चर्चा होत आहे. या निधीसाठी आखाती देशांकडून आर्थिक सहकार्य मागितले जाऊ शकते, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे अमेरिका आपल्या मित्रदेशांचा पाठिंबा मिळवण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे मानले जात आहे.

## लोकलचा दरवाजा बंद करण्यास सांगितल्याने तरुणाची चाकूने हत्या

■ मुंबई

**लोकल** ट्रेनमध्ये दरवाजा बंद करण्यास सांगितल्याच्या वादातून एका २२ वर्षीय तरुणाची चाकूने वार करून हत्या करण्यात आली. मयंक लोहार असे मृत तरुणाचे नाव असून, तो विरार येथे राहणारा होता. या प्रकरणी पोलिसांनी रोशन सुवर्णा या आरोपीला अवघ्या १४ तासांत कुर्ला येथून अटक केली.

मयंक अंधेरी पश्चिम येथील वेस्टसाईड स्टोअरमध्ये सेल्समन म्हणून काम करत होता. काल रात्री काम संपवून तो घरी परतत असताना ही घटना घडली. रात्री सुमारे १०.४२ वाजता तो अंधेरी स्थानकावरून चर्चगेट-विरार लोकलमध्ये चढला. त्यावेळी जोरदार पाऊस सुरू असल्याने फर्स्ट क्लास डब्यात पाणी येत होते. त्यामुळे दरवाजा बंद करण्याच्या मुद्यावरून मयंक आणि रोशनमध्ये वाद झाला. अंधेरी ते बोरिवली दरम्यान हा वाद वाढत गेला आणि त्याचे रूपांतर हाणामारीत झाले. रागाच्या भरात आरोपीने मयंकच्या पोटात धारदार शस्त्राने वार केला. या हल्ल्यात तो गंभीर जखमी झाला. त्यानंतर ट्रेन बोरिवली स्थानकावर पोहोचताच आरोपी ट्रेन थांबण्यापूर्वीच पळून गेला. जखमी अवस्थेत मयंकला तत्काळ स्थानकावरील वैद्यकीय कक्षात नेले आणि नंतर कांदिवली येथील शताब्दी रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र आज पहाटे उपचारादरम्यान त्याचा » पान ७ वर

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

## मुंद्रा विमानतळावरून मुंबई, गोवा विमान सेवा सुरू

**कच्छ** - मुंद्रा विमानतळावरून मुंबई आणि गोवा यांना जोडणाऱ्या पहिल्या नियोजित विमानसेवेची घोषणा केली आहे. स्टार एअरच्या आठ नव्या हवाई सेवांचा शुभारंभ करण्यात आला. अदानी समूहाच्या मालकीचे मुंद्रा बंदर हे भारतातील सर्वात मोठे खासगी आणि व्यावसायिक कंटेनर बंदर असून, या नव्या हवाई संपर्कामुळे त्याच्या व्यावसायिक क्षमतेत आणखी वाढ होणार आहे. मुंबई आणि गोवा व्यतिरिक्त हिंडोन, सुरत, बेळगाव, बंगळुरू, कोल्हापूर आणि नांदेड या शहरांकडे विमान सेवा सुरू होणार आहे.

## धर्मांतर प्रकरणी टीसीएस दोषी नाही मुख्यमंत्र्यांकडून समितीची घोषणा

■ मुंबई

**नाशिकच्या** टीसीएस कंपनीतील धर्मांतर प्रकरणावर विधानसभेत चर्चा झाली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, नाशिकच्या घटनेत मॅनेजमेंटने वेळेवर कारवाई केली नाही. त्यामुळे त्या प्रकरणात मॅनेजरला आरोपी करून एकूण ९ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मात्र, या प्रकरणात 'टीसीएस' या कंपनीचा कोणताही थेट सहभाग नाही. कंपनीने तपासात पूर्ण सहकार्य केले आहे आणि सरकार सुचवेल त्या सर्व उपाययोजना लागू करण्याची तयारी दर्शवली आहे.

नाशिक येथील टीसीएस आणि पुण्यातील विप्रो कंपनीतील धक्कादायक घटनांचा दाखला देत भाजपाच्या आमदार चित्रा वाघ यांनी सरकारला कठोर कारवाईची मागणी केली. यावर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, बऱ्याच कॉर्पोरेट कंपन्यांमध्ये धर्मांतर आणि महिलांचा छळ करण्याची एक 'मोडस ऑपरेंडी' चालल्याचे आमच्या निदर्शनास आले आहे. सद्य:स्थितीतील कायदे हे खासगी कार्यालये आणि रात्रीच्या शिफ्टमध्ये काम करणाऱ्या महिलांच्या आजच्या वाढत्या संख्येनुसार अपुरे पडत आहेत. त्यामुळे कायद्यात सुधारणा करण्यासाठी, दोन्ही सभागृहांतील महिला सदस्यांची मिळून एक विशेष कमिटी तयार केली जाईल.

## बँक ऑफ इंडियाला १०० कोटी द्या नीरव मोदीला लंडन कोर्टाचा आदेश

■ लंडन

**फरार** हिरे व्यापारी नीरव मोदीला लंडनच्या न्यायालयाकडून मोठा धक्का बसला आहे. कर्ज वसुलीच्या प्रकरणात लंडन न्यायालयाने 'बँक ऑफ इंडिया'च्या बाजूने निकाल दिला आहे. न्यायालयाने नीरव मोदीला १०.७ मिलियन डॉलर म्हणजेच साधारण १०० कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम बँकेला परत करण्याचे आदेश देण्यात आलेत.

हे प्रकरण नीरव मोदीने २०१३ मध्ये आपल्या फायरस्टार डायमंड कंपनीच्या कर्जासाठी दिलेल्या वैयक्तिक हमीशी संबंधित आहे. कंपनीने कर्ज थकवल्यानंतर बँकेने



न्यायालयाचे दरवाजे ठोठावले होते. बँकेने न्यायालयात सांगितले की, नीरव मोदीने कर्जासाठी वैयक्तिक हमी दिली होती. त्यामुळे कर्जाची थकीत रक्कम परत करणे ही त्याची जबाबदारी आहे. नीरव मोदीने लंडनच्या न्यायालयांमध्ये या दाव्याला आव्हान दिले होते. या प्रकरणात स्वतःची बाजू मांडण्यासाठी तो लंडनच्या कोर्टात स्वतः हजरही झाला होता. सुनावणीनंतर लंडनच्या न्यायालयाने बँकेच्या बाजूने निकाल देत नीरव मोदीला सुमारे १०० कोटी रुपये (१०.७ मिलियन डॉलर) बँकेला देण्याचे आदेश दिले आहेत. न्यायालयाने या प्रकरणाच्या सुनावणीनंतर हे मान्य केले की, बँक ऑफ इंडियाचा दावा पूर्णपणे योग्य आणि कायदेशीररित्या भक्कम आहे.

## 'आरे वाचवा' आंदोलनाचा रविवारी २००वा आठवडा

■ मुंबई

**आरे** कॉलनीतील जंगलाचे संरक्षण करण्यासाठी सुरू असलेले नागरिकांचे 'सेव्ह आरे' (आरे वाचवा) आंदोलन येत्या रविवारी एक महत्त्वाचा टप्पा गाठणार आहे. पर्यावरण कार्यकर्ते आणि स्थानिक रहिवासी सलग २००व्या आठवड्यातील निदर्शनांसाठी एकत्र येणार आहेत. आरे कॉलनीतील लोकप्रिय पिकनिक स्पॉट येथे रविवारी सकाळी ११ वाजता हे आंदोलन होणार असून, जुलै २०२२ मध्ये पुन्हा सुरू झाल्यापासून जवळपास चार वर्षे अखंडपणे दर रविवारी निदर्शने करण्यात येत आहेत.

'सेव्ह आरे' उपक्रमाची सुरुवात सुमारे २०१० च्या सुमारास सोशल मीडियावरील जनजागृती आणि नागरिकांच्या सहभागातून झाली. यासाठी स्वतंत्र फेसबुक पेजही तयार करण्यात आले होते. नोव्हेंबर २०१४ मध्ये मुंबई मेट्रोच्या कारशेडसाठी आरेतील झाडे आणि गवताळ क्षेत्र नष्ट करण्याच्या प्रस्तावाविरोधात नागरिकांची पहिली औपचारिक बैठक झाली. नंतर हे आंदोलन मोठ्या लोकचळवळीत रूपांतरित झाले.

## 'टाटा'नंतर 'बजाज'वर सायबर हल्ला शेअर अडीच टक्क्यांनी खाली घसरला

■ मुंबई

**टाटा** ईलेक्ट्रॉनिक्सनंतर आता देशातील आघाडीची वाहन उत्पादक कंपनी बजाज ऑटोवर सायबर हल्ला करण्यात आला आहे. कंपनीच्या आयटी यंत्रणेवर झालेल्या रॅन्समवेअर सायबर हल्ल्याची माहिती मिळाल्यानंतर शेअर बाजारात बजाज ऑटो कंपनीचा शेअर १० हजार रुपयांच्या खाली घसरला. त्यामुळे गुंतवणूकदारांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. सायबर हल्लेखोर भारतीय कंपन्यांना लक्ष्य करत असल्याचेही यातून दिसत आहे.

कंपनीने दिलेल्या माहितीनुसार, हॅकर्सनी बजाज ऑटोच्या मुख्य सर्व्हर आणि




डेटा व्यवस्थापन प्रणालीला लक्ष्य करण्याचा प्रयत्न केला. हा रॅन्समवेअर हल्ला होता. अशा प्रकारच्या हल्ल्यात संगणकातील डेटा लॉक किंवा एन्क्रिप्ट करून तो पुन्हा उपलब्ध करून देण्यासाठी खंडणीची मागणी केली जाते. या घटनेची माहिती मिळताच कंपनीच्या आयटी विभागाने उपाययोजना सुरू केल्या. प्रभावित यंत्रणा सुरक्षित करण्याबरोबरच डेटा सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक पावले उचलली. सध्या या हल्ल्याचा कंपनीच्या उत्पादन प्रक्रियेवर किंवा दैनंदिन कामकाजावर किती परिणाम झाला आहे, याची तपासणी सुरू आहे. या सायबर हल्ल्यानंतर शेअर बाजारात बजाज ऑटोच्या समभागात मोठी घसरण झाली.

## ग्रेट निकोबार प्रकल्पाबाबत स्पष्टीकरण द्या! जयराम रमेश यांची मागणी

■ नवी दिल्ली

**ग्रेट निकोबार** बेट प्रकल्पाबाबत चिंता व्यक्त करणारे काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांना पत्र लिहिले आहे. या पत्राद्वारे त्यांनी प्रकल्पांतर्गत उभारल्या जाणाऱ्या 'ट्रान्सशिपमेंट पोर्ट'च्या (मालवाहतूक हस्तांतरण बंदराच्या) विकासाबाबत स्पष्टीकरण मागितले आहे.



जयराम रमेश म्हणाले की, ग्रेट निकोबार आयर्लंड प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणावर पर्यावरणाची हानी होऊ शकते. याबाबत अनेक नागरिकांमध्ये चिंता आहे. या प्रकल्पासाठी खासगी क्षेत्राच्या सहभागासाठी निविदा कधी काढल्या जाणार, तसेच प्रकल्पासाठी खासगी भागीदार आणि ऑपरेटरची अंतिम निवड कधी होणार, याबाबत स्पष्ट कालमर्यादा जाहीर करावी. या प्रकल्पात खासगी गुंतवणुकीचा हिस्सा किमान ५५ टक्के निश्चित करण्यात आला असताना, यात १०० टक्के खासगी मालकीला परवानगी दिली जाईल का? तसेच, यात सरकारी संस्थांचीही काही किमान मालकी (हिस्सा) असणार आहे.

## लेहमध्ये केंद्राच्या विरोधात तीव्र निदर्शने, बंद पाळला

**लडाखला केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा मिळाल्यानंतर सुरू असलेल्या विविध मागण्यांसाठी लेह ॲपेक्स बॉडी आणि कारगिल डेमोक्रॅटिक अलायन्स यांनी पुकारलेल्या बंदमुळे काल लडाखमध्ये जनजीवन विस्कळीत झाले. केंद्र सरकारसोबत विश्वसनीय चर्चा व्हावी या मागणीसाठी हजारो लोकांनी लेहमध्ये निदर्शने केली.**



**लेह** - आंदोलनकर्त्या गटांनी केंद्र सरकारवर विश्वासाचा अभाव निर्माण केल्याचा आरोप केला आहे. २२ मे रोजी झालेल्या चर्चेत जे मुद्दे मान्य झाले होते ते अधिकृत 'मिनिट्स ऑफ मीटिंग' मध्ये समाविष्ट न केल्याने आंदोलकांमध्ये रोष आहे. लेफ्टनंट गव्हर्नरच्या अधिकाराखालील प्रशासनाने मद्य धोरण, जमीन, वीज, वाहतूक आणि पर्यटन यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर स्थानिक जनतेला विश्वासात न घेता घेतलेल्या निर्णयांचाही त्यांनी निषेध केला.

## कॉकरोच पार्टी अतिरेक्यांची बी टीम! धर्मेंद्र प्रधानांची टीका

■ नवी दिल्ली

**दिल्लीतील** जंतर-मंतरवर कॉकरोच जनता पार्टीकडून गेल्या ५ दिवसांपासून सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी या संघटनेवर जोरदार टीका करत तिला अतिरेक्यांची बी टीम असे संबोधले.



एका मुलाखतीत प्रधान म्हणाले की, लोकशाहीत जनतेकडून नाकारले गेलेले काही लोक आता वेगवेगळे चेहरे आणि भूमिका घेऊन परत आले आहेत. ते विद्यार्थ्यांच्या मनात भीती निर्माण करून परीक्षा प्रक्रियेला बदनाम करण्याचा प्रयत्न करत आहेत. देशाला अस्थिर करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांच्या बाजूने घोषणाबाजी करणाऱ्यांची ओळख आता जनतेला झाली आहे. कॉकरोच जनता पार्टी अतिरेक्यांची बी टीम असल्यासारखी वागत आहे. यावर कॉकरोच पार्टीचे संस्थापक अभिजित दीपके याने प्रत्युत्तर देत म्हटले की, आम्ही विद्यार्थ्यांसाठी न्यायाची मागणी करत आहोत. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर आवाज उठवणाऱ्यांना दहशतवादी म्हणणे दुर्दैवी आहे. आम्ही अतिरेकी नाही आणि आम्हाला कुणाकडूनही देशभक्तीचे प्रमाणपत्र घेण्याची गरज नाही.

नवाकाळ
Email- contact@navakal.in www.navakal.in /navakalofficial

# छोट्या जाहिराती

संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

गोरेगाव पूर्वयेथे व्हेज/ नॉनव्हेज रेस्टॉरंटसाठी अनुभवी कर्मचारी पाहिजेत- कॅप्टन, किचन मॅनेजर, वेटर्स, किचन हेल्पर्स, टेबल क्लिनिंग बॉय, डिलीव्हरी बॉय, किचन शेफ, फूड पार्सल पॅकींग स्टाफ, कॅशियर/ बिलिंग एक्झिक्युटिव्ह, किचन मोरी स्टाफ. संपर्कः **9833119998** {NC260985}

लोन रिकवरी करण्यासाठी ठाणेयेथे मुले, मुली, स्त्री, पुरुष पाहिजेत. **9326370962** {NC260989}

ETP/ STP/ WTP च्या कामाचा अनुभव असणारे काम करणारे आणि करून घेणारे 5 वर्कींग सुपरवायझर/ टेक्निशियन मेहनती आणि विश्वासू पाहिजे, पगार 30000 शिक्षण 12वी, कमीतकमी 5 वर्षांचा अनुभव आवश्यक, लोअरपरेल **9870569000** {NC261014}

सतगुरू इंटरप्राईज कंपनीकरीता विलेपार्ले येथे नामांकित शाळा आणि कॉलेजमध्ये त्वरित हाऊसकिपिंग सुपरवायझर आणि प्यून पाहिजेत (वयोमर्यादा- 45 वर्षापर्यंत) पत्ताः- 414, ई-विंग, ४ था माळा, झी-शान, opp. सनसिटी सिनेमा, एम.जी. रोड, विलेपार्ले (पूर्व). satguruenterprise1@gmail.com/ **7738144572, 9820426010** {NC261015}

खारयेथे हाऊसकीपिंगसाठी मुले आणि सुपरवायझर, प्रभादेवी कमलामिलसाठी आणि दादरकरिता हाऊसकीपर मुले तसेच होम क्लीनिंगसाठी मुले पाहिजेत. Clean House Services: **7045908864/ 9321022969** {NC261056}

विलेपार्ले पूर्व येथे पार्सलसाठी मुले/मुली, हाऊसकिपींग मुले,मोरीसाठी मुलगा, फरसाण कारीगार, किचन हेल्पर, कॅश काउंटरसाठी - २ माणसे पाहिजेत. संपर्क **9867510783** {NC261053}

## पाहिजेत

बोरीवली (पूर्व) इमीटेशन कामासाठी मुली पाहिजेत (दिवसाचे 425/-)+ ट्रावेलींग. **8369776798.** {NC261050}

पेस्ट कंट्रोल कंपनीला मुंबई, गोवा, लोणावळा, गुजरातमधील, सहाय्यक, ऑपरेटर, पर्यवेक्षक पाहिजेत. राहण्याची सोय (पगार- १५,०००/-+ बेनिफिट). - **9930016908/ 8291819117** {NC260944}

मुंबईमधील नामांकित प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला Water Purifier Service Technician पाहिजेत फिक्स पगार व कमिशन, ''फ्रेशर्स''ना ट्रेनिंग दिले जाईल संपर्क- **8097070483** {NC261058}

मावशी, वॉर्डबॉय, कुक, नर्स, पेशंटकेअर, (Male+ Female) पाहिजेत (राहणेखाणे+ पगार) वीकेअर होम (महिला आश्रम) ठाणे **9136404828** {NC261061}

मॅरेजब्युरो/ ज्योतिषशास्त्र ऑफिससाठी ठाणे येथे स्टाफ पाहिजेत. **7045943167/ 7045216645** {NC261060}

काचपाडा, मालाड वेस्टमधील कंपनीला हेल्पर कामासाठी मेहनती मुले पाहिजेत. **8879300487** {NC261059}

## व्यवसायविषयक

स्वतःचा लघुउद्योग सुरू करून दिवसा 3000/- कमवा अनिरुद्धा दादर- **9076403434/ 8652643434** {NC260937}

### वाचकांना सूचना

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.
- मॅनेजर, 'नवाकाळ'

# काटोलच्या नगराध्यक्षा शेकापच्या देशमुखांचे जात प्रमाणपत्र रद्द

■ नागपूर

**नागपुरातील** काटोलच्या शेतकरी कामगार पक्षाच्या नगराध्यक्षा अर्चना देशमुख यांचे जात प्रमाणपत्र जात पडताळणी समितीने रद्द केले आहे. देशमुख यांनी ओबीसी प्रवर्गातून नगराध्यक्षपदाची निवडणूक लढवून विजय मिळवला होता. या निर्णयामुळे त्यांचे नगराध्यक्षपद धोक्यात आले आहे. भाजपाच्या उमेदवार कल्पना उमप यांनी अर्चना देशमुख यांच्या जातीच्या दाव्याविरोधात हरकत घेतली होती.

# मुलांमधील लठ्ठपणा रोखण्यासाठी शाळांमध्ये 'शुगर बोर्ड' बनवणार

■ मुंबई

**राज्यातील** मुलांमध्ये वाढत्या लठ्ठपणाच्या समस्येवर नियंत्रण मिळवण्यासाठी शाळांमध्ये विशेष उपाययोजना राबविण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांना साखरयुक्त पदार्थांच्या अतिसेवनामुळे होणाऱ्या दुष्परिणामांची जाणीव करून देण्यासाठी सर्व शाळांमध्ये 'शुगर बोर्ड' स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत. विधानसभेत आमदार धनंजय मुंडे, संतोष दानवे आणि रईस शेख यांनी राज्यातील मुलांमधील वाढत्या लठ्ठपणाबाबत प्रश्न उपस्थित केला होता. त्याला उत्तर देताना सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली.

# संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या इतिहासाचे शासन जतन करणार

■ मुंबई

**संयुक्त** महाराष्ट्र चळवळीचा इतिहास, त्यातील हुतात्म्यांचे योगदान आणि महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीसाठी झालेल्या संघर्षाची माहिती पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचावी, या उद्देशाने राज्य शासनाने या चळवळीशी संबंधित दुर्मिळ दस्तावेज, छायाचित्रे आणि मौखिक इतिहासाचे जतन करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी विधानसभेत माहिती दिली.


### जाहीर सूचना

याद्वारे सूचित करण्यात येते की, सिंडिकेट कंटेनर लाइन्स प्रायव्हेट लिमिटेडचे नोंदणीकृत कार्यालय, जे पूर्वी ग्राउंड फ्लोअर, रूम क्र. 07, पटेल वाडी, ए.बी. नायर रोड, सांताक्रुझ, जुहू चर्च, हॉटेल नोव्होटेलजवळ, जुहू, मुंबई - 400049 येथे स्थित होते, ते दिनांक 07-05-2026 पासून शिव चेंबर, प्लॉट क्र. 21, ए विंग, कार्यालय क्र. 211, सेक्टर 11, सीबीडी बेलापूर - 400614 येथे स्थलांतरित करण्यात आले आहे.
सदर स्थलांतराबाबत कोणत्याही व्यक्तीस काही दावा, आक्षेप किंवा शंका असल्यास, त्यांनी या सूचनेच्या प्रसिद्धीपासून 15 दिवसांच्या आत नवीन नोंदणीकृत कार्यालयाच्या पत्त्यावर किंवा +91 7208982116 या दूरध्वनी क्रमांकावर अधोहस्ताक्षरी यांच्याशी संपर्क साधावा.
स्थळ : नवी मुंबई
दिनांक : 25-06-2026
सिंडिकेट कंटेनर लाइन्स प्रायव्हेट लिमिटेड
तर्फे व त्यांच्या वतीने
श्री. बाबू करियादन चेरिया
(संचालक)

### मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ
म्हाडा MHADA

निविदा सुचना क्र. :- का. अ. /शहर / मुं.झो.सु.मंडळ/ ई-निविदा/०३/२०२६-२७

कार्यकारी अभियंता (शहर) विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३९, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ म्हाडा व सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांचेकडे नोंदणीकृत पात्र मुंबई शहर जिल्हा मधील सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांचेकडून एकूण ०८ कामाकरीता बी-१ (टक्केवारी) नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागविण्यात येत आहेत. विस्तृत निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेत स्थळावर **https://mahatenders.gov.in** उपलब्ध असतील. कुठलीही अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सविस्तर जाहिरात व कामांचा तपशिल www.mhada.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असेल. निविदा विक्री दिनांक २५.०६.२०२६ दुपारी १.०० पासून दिनांक ०२.०७.२०२६ दुपारी १५.०० पर्यंत राहील. निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक / बदल असल्यास फक्त म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता (शहर) मुं. झो. सु. मंडळ यांनी राखुन ठेवला आहे.

सही/-
कार्यकारी अभियंता (शहर),
मुं. झो. सु. मंडळ, मुंबई

CPRO/A/484
Follow us: @mhadaofficial
म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

### महानिर्मिती
निविदा सूचना क्रमांक : सीपीए - १५ - २०२६

खालील बाबींच्या पुरवठ्यासाठी दुहेरी लिफाफा पद्धतीद्वारा इलेक्ट्रॉनिक निविदा मागविण्यात येत आहेत.

| निविदा क्रमांक | निविदा विवरण | निविदा विक्रीचा कालावधी |
|---|---|---|
| ३००००६९७९९ | महानिर्मिती कंपनीच्या विविध विद्युत केंद्रांसाठी एच. टी. केबल्स खरेदी करणेबाबत. | ०८/०७/२०२६ - १०.०० वाजे पर्यंत |

संपर्क तपशील: मुख्य अभियंता (म.ख.वि.) यांचे कार्यालय,
दूरध्वनी क्र : ०२२-६९८५ ३६१७ / ३६१८
अधिक तपशिलाकरिता **https://eprocurement.mahagenco.in/** या वेबसाईटला भेट द्या.
मुख्य अभियंता (म.ख.वि.)

### जाहीर सूचना
(नादारी आणि दिवाळखोरी संहिता, २०१६ (आयबीसी) च्या कलम १०२ अंतर्गत)
**पियुष एच. जोशी यांच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

याद्वारे सूचना देण्यात येते की, माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई यांनी, पियुष एच. जोशी यांनी आयबीसीच्या कलम ९४ अन्वये दाखल केलेल्या सी.पी. (आयबी) क्र.२८४/एमबी/२०२६ मध्ये, त्यांच्या दिनांक २२.०६.२०२६ च्या आदेशान्वये (प्राप्त दिनांक २३.०६.२०२६), आयबीसीच्या कलम १०० अन्वये पियुष एच. जोशी यांची दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया सुरू करण्याचा आदेश दिला आहे.
त्यानुसार, पियुष एच. जोशी यांच्या धनकोंना याद्वारे आमंत्रित करण्यात येत आहे की त्यांनी त्यांचे दावे पुराव्यासह विहित नमुना 'ब' मध्ये दिनांक १६.०७.२०२६ रोजी किंवा त्यापूर्वी रिझोल्यूशन प्रोफेशनल यांच्याकडे २०५-ए, दुसरा मजला, प्लॉट नं ४०८, हिरेन लाईट इंडस्ट्रियल इस्टेट, भागोजी कीर मार्ग, पॅराडाईज सिनेमाजवळ, माहीम, मुंबई शहर, महाराष्ट्र-४०००१६ या पत्त्यावर किंवा piyushpgrp@gmail.com या ईमेलद्वारे सादर (नोंदणी) करावेत.
धनको त्यांच्या दाव्यांचे तपशील इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे, किंवा प्रत्यक्षपणे, किंवा नोंदणीकृत टपालाद्वारे, किंवा स्पीड पोस्टद्वारे, किंवा कुरिअरद्वारे सादर (नोंदणी) करू शकतात.

| | वैयक्तिक जामीनदार पियुष एच. जोशी यांचा तपशील | |
|---|---|---|
| १. | वैयक्तिक जामीनदाराचे नाव | पियुष एच. जोशी |
| २. | वैयक्तिक जामीनदाराचा पत्ता | ए/१२०२, योगी रत्ना इमारत, योगी नगर, एक्सर रोड,बोरिवली (प), मुंबई - ४०००९१. |
| ३. | दिवाळखोरी प्रारंभाची तारीख | २२.०६.२०२६ (आदेश प्राप्त २३.०६.२०२६) |
| ४. | दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया बंद होण्याची अंदाजित तारीख | १९.१२.२०२६ |
| ५. | दावे सादर करण्याची अंतिम तारीख | १६.०७.२०२६ |
| | रिझोल्यूशन प्रोफेशनलचे तपशील | |
| ६. | रिझोल्यूशन प्रोफेशनल म्हणून काम करणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक | श्री. मनिष लालजी दावडा आयबीबीआय नोंदणी क्र.: IBBI/IPA-001/IP-P-02506/2021-2022/13797 एएफए प्रमाणपत्र क्र.: एए१/१३७९७/०२/३००६२७/ १०९४०६ (वैधता-३०.०६.२०२७ पर्यंत) |
| ७. | मंडळाकडे नोंदणीकृत असलेल्या रिझोल्यूशन प्रोफेशनलचा पत्ता आणि ई-मेल | पत्ता: २०५-ए, २रा मजला, प्लॉट क्र. ४०८, हिरेन लाईट इंडस्ट्रियल इस्टेट, भागोजी कीर मार्ग, पॅराडाईज सिनेमाजवळ, माहीम, मुंबई शहर, महाराष्ट्र-४०००१६ ईमेल आयडी : ip.dawdamanish@gmail.com पत्रव्यवहाराचा मेल आयडी - piyushpgrp@gmail.com |
| ८. | दावा अर्जासाठी युआरएल | https://ibbi.gov.in/en/home/downloads |

खोटे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास, दिवाळखोरी आणि नादारी संहिता, २०१६ च्या तरतुदींनुसार किंवा इतर कोणत्याही लागू कायद्यांनुसार दंड आकारला जाईल.

सही/-
दिनांक: २५.०६.२०२६ श्री. मनिष लालजी दावडा
ठिकाण: मुंबई रिझोल्यूशन प्रोफेशनल
आयबीबीआय नोंदणी क्र.: IBBI/IPA-001/IP-P-02506/2021-2022/13797
एएफए प्रमाणपत्र क्र.: एए१/१३७९७/०२/३००६२७/ १०९४०६ (वैधता-३०.०६.२०२७ पर्यंत)

### बृहन्मुंबई महानगरपालिका
मुख्य अभियंता (घन कचरा व्यवस्थापन) प्रकल्प
क्र. मु.अभि./१३२३/घकव्य/प्रकल्प दि. २४.०६.२०२६
**ई-निविदा सूचना**

बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त खालील ई-निविदा मागवित आहेत.

| कामाचे नाव | कंत्राट कालावधी | इ.र.अ. रु.मध्ये | निविदा शुल्क | बोली सुरुवात दिनांक व वेळ | बोली समाप्ती दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|
| "देवनार डंपिंग ग्राउंड येथे हर्बल आधारित डिओडरंट आणि कीटक-प्रतिरोधकाची फवारणी करण्याकरिता ट्रॅक्टर्सची सेवा भाड्याने घेणे." निविदा आयडीः २०२६_बृमुंमपा_१३११०६९ | एलओए/एसएपी पीओ (जे आधी होईल ते) प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून प्रत्येकी ०८ तासांच्या २१९० पाळ्या किंवा ४०० दिवस (जे नंतर होईल ते) | रु. ५१,३००/- (रुपये एकावन्न हजार तीनशे मात्र) | रु. १५,९७२/- + १८% जीएसटी म्हणजेच रु. १८,८५०/- (महाटेंडर पोर्टलवर ऑनलाईन भरणा करावा) | २५.०६.२०२६ स. ११.०० वा. नंतर | ०१.०७.२०२६ सायं. १६.०० वाजेपर्यंत |
| देवनार डंपिंग ग्राउंड येथे स्वागत कक्षाचे नूतनीकरण. २०२६_बृमुंमपा_१३१११०८ | एलओए/एसएपी पीओ (जे आधी होईल ते) प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ४५ दिवस | रु. १०,६००/- (रुपये दहा हजार सहाशे मात्र) | रु. ३,९९३/- + १८% जीएसटी (महाटेंडर पोर्टलवर ऑनलाईन भरणा करावा) | २५.०६.२०२६ स. ११.०० वा. नंतर | ०१.०७.२०२६ सायं. १६.०० वाजेपर्यंत |

निविदा प्रत महाटेंडर्स पोर्टल (http://mahatenders.gov.in) वर "निविदा" विभागामधून डाऊनलोड करता येईल. अधिक तपशिलाकरिता http://mahatenders.gov.in वर लॉग ऑन करा.

सही/-
पीआरओ/६६२/जाही./२०२६-२७ का.अ.(घकव्य) प्रकल्प-देवनार

खिडक्यांसाठी जाळ्यांचा व मच्छरदाण्यांचा वापर करा.




# आजचे राशी भविष्य

गुरुवार ता. २५ जून २०२६
ज्योतिष पंडीत अर्चना तारु

| | |
|---|---|
| मेष | भागीदारी व्यवसायात आर्थिक लाभ होतील. आर्थिक उलाढाल मोठ्या प्रमाणात करण्याचे योजाल. वैवाहिक जीवनात गोडवा राहील. |
| वृषभ | महत्वाच्या कामातील अडचणी दूर होतील. प्रवासात चीजवस्तू सांभाळा. आरोग्याच्या समस्या उद्भवू शकतात. |
| मिथुन | कार्यक्षेत्रात नवीन ओळखी होतील. काही कामामध्ये त्यांची मदत होईल. प्रेमात प्रतिसाद मिळेल. |
| कर्क | घराचे स्वप्न पूर्ण होणार आहे. नोकरीमध्ये नवीन संधीचे सोने कराल. विवाहोत्सुक व्यक्तींना अनुकूलता राहील. |
| सिंह | एकाचवेळी अनेक गोष्टी मार्गी लागतील. प्रवास करावा लागेल. भावंडांच्या गाठीभेटी होतील. |
| कन्या | आर्थिक व्यवहार जपून करावेत. आवडत्या भोजनाचा आस्वाद घ्याल. नातेवाईक भेटतील. |
| तूळ | आनंदाचा दिवस असेल. मनोबल उत्तम राहील. तुमच्या व्यक्तिमत्वाची छाप पडेल. जोडीदाराचे सहकार्य लाभेल. |
| वृश्चिक | कार्यक्षेत्रात काही अडचणी निर्माण होतील. कायद्याची बंधने पाळावी लागतील. प्रवासात सतर्कता बाळगावी. |
| धनु | योजलेल्या कामांमध्ये सफलता मिळेल. आर्थिक चिंता मिटतील. मात्र व्यवहार विचारपूर्वक करावेत. |
| मकर | कार्यक्षेत्रात दबदबा वाढेल. तुमच्या कामाची प्रशंसा होईल. वरिष्ठांची मर्जी संपादन कराल. |
| कुंभ | भाग्याची साथ लाभेल. अडचणी दूर होतील. एखाद्या कलाछंदात रमाल. जोडीदाराबरोबर छोट्या सहलीचा आनंद लुटाल. |
| मीन | व्यवसायात अधिक परिश्रम घ्यावे लागतील. अडचणीवर हळूहळू मार्ग निघेल. आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका. |


### सार्वजनिक सूचना

सर्व संबंधित व्यक्ती व सर्वसाधारण जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते कीः माझे अशील, श्री. गुफरान रिझवान सय्यद व सौ. मायमुना गुफरान सय्यद यांनी फ्लॅट क्र. 404, चौथा मजला, विंग 3-ई, स्वागत को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि. दमोदर पार्क, एल.बी.एस. मार्ग, घाटकोपर (पश्चिम), मुंबई 400 086, क्षेत्रफळ 580 चौ.फूट बांधकाम क्षेत्र, सी.टी.एस. क्र. 21 (भाग), 32, 49 (भाग) ते 160 (भाग) हा सदनिका खरेदी केलेली आहे. सदर खरेदी दि. 14 मे 2026 रोजी झालेल्या विक्री कराराद्वारे झाली असून, तो करार सह दुय्यम निबंधक, मुंबई-27 यांच्या कार्यालयात दि. 15 मे 2026 रोजी नोंदणी क्र. 10831/2026 अन्वये इंडेक्स-II प्रमाणे नोंदणीकृत आहे. मालकी हक्काचा क्रम / चेन ऑफ टायटलः सदर फ्लॅट पूर्वी खालील व्यक्तींच्या संयुक्त नावावर होताः
1. श्री. धर्मेश अनिल शेठ
2. सौ. विभूती धर्मेश शेठ
3. सौ. शोभना अनिलकुमार शेठ
4. श्री. अनिलकुमार शांतीलाल शेठ – विक्रेते
शेअर प्रमाणपत्र क्र. 172 दि. 17 फेब्रुवारी 1991 हे त्यांच्या संयुक्त नावावर दि. 8 फेब्रुवारी 2019 रोजी श्री. नमन वसंत शाह व सौ. दक्ष वसंत शाह यांच्या नावावरून वर्ग करण्यात आले होते. सोसायटीच्या नोंदीनुसार मालकीचा कालानुक्रमिक क्रम पुढीलप्रमाणे:
1. श्री. सुरेश एल. कुकरेजा – पहिले मालक
2. श्री. अनिलकुमार खेमचंद खंदार व सौ. लता अनिल खंदार
3. श्री. नमन वसंत शाह व सौ. दक्षा वसंत शाह
4. श्री. धर्मेश अनिल शेठ व इतर – सद्य विक्रेते
5. श्री. गुफरान रिझवान सय्यद व सौ. मायमुना गुफरान सय्यद – सद्य खरेदीदार
माझ्या अशीलांनी सदर फ्लॅटवर गृहकर्जासाठी अर्ज केला आहे. कर्ज देणाऱ्या बँक/वित्तीय संस्थेने खालील जुन्या लिंक कागदपत्रांची मागणी केली आहे: 1. मेसर्स पारूल एन्टरप्रायझेस व सौ. आशा नंदलाल चावला यांच्यातील विक्री करार 2. सौ. आशा नंदलाल चावला व श्री. सुरेश लचंद कुकरेजा यांच्यातील विक्री करार – ज्यांचे नाव शेअर प्रमाणपत्र क्र. 172 दि. 17.02.1991 च्या समोरच्या बाजूस नमूद आहे. परंतु, ही दोन लिंक कागदपत्रे स्वागत सी.एच.एस. लि. च्या नोंदीत किंवा पूर्वीच्या मालकांकडे, श्री. धर्मेश अनिल शेठ व इतर यांच्याकडे उपलब्ध नाहीत. माझ्या अशीलांनी विक्रेत्यांना संपूर्ण आगाऊ रक्कम दिली असून, सर्व संबंधित विक्री कागदपत्रे पूर्ण केली आहेत तसेच संबंधित सरकारी कार्यालय, नोंदणी व मुद्रांक शुल्क कार्यालय, मुंबई यांच्याकडे आवश्यक मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क भरले आहे. हरकतींसाठी आवाहन: जर कोणत्याही व्यक्ती/बँक/वित्तीय संस्था/सोसायटी किंवा इतर कोणत्याही घटकाकडे वरील हरवलेल्या लिंक कागदपत्रांपैकी कोणतेही कागदपत्र त्यांच्या ताब्यात/तारणात/नियंत्रणात असतील, किंवा सदर फ्लॅट संदर्भात कोणताही हक्क, मालकी, व्याज, तारण, गहाण, आकारणी किंवा कोणत्याही प्रकारची हरकत असेल, तर त्यांनी या सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून 15 दिवसांच्या आत, कोणत्याही कामाच्या दिवशी सायं. 5:00 ते 7:00 या वेळेत, खालील पत्त्यावर लेखी स्वरूपात व कागदोपत्री पुराव्यासह मला कळवावे. निर्धारित 15 दिवसांच्या आत कोणताही दावा/हरकत प्राप्त न झाल्यास, कोणत्याही व्यक्तीचा कोणताही दावा किंवा हरकत नाही असे गृहीत धरले जाईल आणि माझे अशील पुढील व्यवहार व सोसायटीतील शेअर्स व सभासदत्व हस्तांतरणाची कार्यवाही कोणत्याही पुढील संदर्भाशिवाय पूर्ण करतील. अशा कोणत्याही दाव्याचा सर्व उद्देशांसाठी त्याग झालेला समजण्यात येईल.
दि. 25 जून 2026.

सही/-
ॲड. चंद्रकांत बी. पोफळे
ॲडव्होकेट, उच्च न्यायालय, मुंबई
कार्यालयः 512-ए, कैलास एस्प्लेनेड, एल.बी.एस. मार्ग, घाटकोपर (पश्चिम), मुंबई 400086
मो. 9821440544


### शुभ राशी ता. २५/६/२०२६

| | | |
|---|---|---|
| १ | ६ | ५ |
| १२ | ६२ | ५३ |
| १७ | ६७ | ५८ |
| १३७ | १२३ | १४० |
| ४८९ | ३६७ | २६७ |


### सूचना
**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
**दिनांक : २३.०३.२०२६**

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६
शासन सूचना क्र.टिपीएस-१८२५/१७९/प्र.क्र.३४/२०२५/भारत मंडपम / कन्व्हेशन सेंटर / सूचना /नवि-१३:- ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने राज्यातील बृहन्मुंबई महानगरपालिका व काही नियोजन प्राधिकरणे वगळता उर्वरित सर्व नियोजन प्राधिकरणे व प्रादेशिक योजना क्षेत्रांकरीता लागु करावयाच्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीस (यापुढे जिचा उल्लेख ''उक्त नियमावली'' असा करण्यात आलेला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख ''उक्त अधिनियम'' असा करण्यात आलेला आहे) मधील तरतुदीनुसार, शासन अधिसूचना क्र. टिपीएस-१८१८/प्र.क्र. २३६/१८/ वियो. व प्रायो./ कलम ३७ (१कक) (ग) व कलम २०(४)/नवि-१३, दि. ०२/१२/२०२० अन्वये मंजुरी दिली असून उक्त नियमावली दि.०३.१२.२०२० पासून अंमलात आली आहे;
आणि ज्याअर्थी, शासनाने शासन निर्णय क्र.टिपीएस-१८२५/१७९/प्र.क्र.३४/२०२५/नवि-१३, दि.२०.०३.२०२५ अन्वये भारत मंडपम सांस्कृतिक केंद्राच्या धर्तीवर राज्यातील सात महानगरपालिकांच्या क्षेत्रामध्ये भारत मंडपम या नामाभिधानाने किमान ३० एकर क्षेत्राखालील जागा आरक्षित ठेवण्याकरिता उक्त अधिनियमान्वये कलम ३७(१) अन्वयेचा परिपूर्ण फेरबदल प्रस्ताव शासनास सादर करण्याच्या अनुषंगाने उक्त अधिनियमाचे कलम १५४ अन्वयेचे निदेश पारित केले आहेत (यापुढे ''उक्त निदेश'' असे संबोधिले आहे);
आणि ज्याअर्थी, शासनाने दि.२०.०३.२०२५ रोजी पारित केलेल्या उक्त निदेशानुसार भारत मंडपम सांस्कृतिक केंद्राच्या धर्तीवर राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणांच्या मंजूर विकास योजनेमधील भारत मंडपम / कन्व्हेशन सेंटर या नामाभिधानाचे आरक्षणाचे सुयोग्य विकसनाच्या दृष्टीने उक्त नियमावलीच्या विनियम क्र.११.१ (Table No.11-A) मध्ये नवीन तरतुद क्रमांक ८ (A) व त्यासह विनियम क्र. ४.२७.५ (y) या दोन तरतुदी नव्याने समाविष्ट करणे आवश्यक आहे असे शासनाचे मत झाले आहे (यापुढे ज्याचा उल्लेख ''उक्त फेरबदल'' असा करण्यात आलेला आहे);
आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१कक) (क) व कलम २० (३) अन्वये प्राप्त अधिकारात आणि तदनुषंगिक शक्तींचा वापर करुन, उक्त फेरबदलावर जनतेकडून सूचना / हरकती मागविण्यासाठी शासन ही सूचना प्रसिध्द करीत आहे. उक्त फेरबदलावरील कोणत्याही सूचना / हरकती, ही सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत, संबंधित विभागीय सहसंचालक, नगर रचना यांचेकडे दाखल करता येतील. विभागीय सहसंचालक, नगर रचना यांना प्राप्त सूचना / हरकतींवर सुनावणी देऊन आणि आवश्यकतेनुसार संबंधित नियोजन प्राधिकरणांचे म्हणणे घेऊन, त्यावरील अहवाल शासनास सादर करण्यासाठी शासनातर्फे ''अधिकारी'' म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख ''उक्त अधिकारी'' असा करण्यात येत आहे);
ही सूचना, कामकाजाचे दिवशी एक महिन्याच्या कालावधीकरिता जनतेच्या अवलोकनार्थ खालील कार्यालयात उपलब्ध राहील.
१. विभागीय सहसंचालक, नगर रचना, कोकण / पुणे/नागपूर/ नाशिक / अमरावती/ छत्रपती संभाजीनगर विभाग,
२. आयुक्त, सर्व संबंधित महानगरपालिका. (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता)
३. जिल्हाधिकारी, सर्व जिल्हे.
४. महानगर आयुक्त, सर्व महानगर प्रदेश विकास प्राधिकरणे.
५. व्यवस्थापकीय संचालक, सिडको, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४.
६. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी लि. मुंबई.
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, कोल्हापुर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरण.
८. सर्व विशेष नियोजन प्राधिकरणे/नवनगर विकास प्राधिकरणे.
९. मुख्य कार्यकारी अधिकारी सर्व जिल्हापरिषदा.
१०. मुख्याधिकारी (सर्व नगरपरिषदा/ नगरपंचायती)
ही सूचना शासनाचे संकेतस्थळ www.maharashtra.gov.in (कायदे/नियम) वर उपलब्ध राहील.
महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

सही/-
(प्रणव कर्पे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

**परिशिष्ट- अ**
**शासन सूचना क्र.टिपीएस-१८२५/१७९/प्र.क्र.३४/२०२५/ भारत मंडपम / कन्व्हेशन सेंटर/ सूचना /नवि-१३, दि.२३.०३.२०२६ सोबतचे सहपत्र**
1. The following New Provision at Sr. No.11 A - **"Bharat Mandapam / Convention Centre"** is proposed to be added in Regulation No.11.1 (Table No.11- A Sr.No.8 - Assembly & Institutional) of Unified Development Control and Promotion Regulations (UDCPR) For Maharashtra State As Follows -
**New Provision:-**
Regulation No. 11.1 (Table No.11- A Sr.No.8 - Assembly & Institutional)

| 8 (A) Assembly and Institutional | | |
|---|---|---|
| 1. Bharat Mandapam II. Convention Center | Planning Authority / Appropriate Authority / Owner | I In case of Bharat Mandapam, this reservation shall be proposed only in the jurisdiction of areas of the Municipal Corporations mentioned in the directives dt.20.03.2025 issued by the State Government u/s 154 of the MR & TP Act, 1966 and as amended by the State Government time to time.<br>II. For the Bharat Mandapam reservation, the area of the plot should be 30 acre or more.<br>III. For the Convention Centre reservation, the area of the plot should be 50,000 sq.mts or more.<br>IV. Appropriate Authority for development/ redevelopment of the said reservations shall be concerned Municipal Corporation / Maharashtra Tourism Development Corporation.<br>V. The Planning Authority/Appropriate Authority may acquire and develop the site for the same purpose.<br>OR<br>The Planning Authority/Appropriate Authority after acquiring the land lease it out - for developing and running or after developing itself, lease out for running it, as the case may be, as per the provisions of the Authorities' Act Act to a Registered Institution/-gency having requisite expertise in the field.<br>OR<br>The owner may be allowed to develop entire reservation for intended purpose according to the designs; specifications and conditions prescribed by the Authority.<br>OR<br>The Planning Authority or Appropriate Authorities may entrust the development, operation and maintenance of the entire reservation to an appropriate agency.<br>i. The Authority may allow the owner to develop the reservation, subject to handing over to the Planning -uthority an independent plot along with constructed amenity of total area, mentioned in Note-1 below this table as per norms prescribed by the Authority.<br>ii. The owner shall be entitled to develop remaining land for the uses permissible in adjoining zone with full permissible FSI of the entire Plot and permissible TDR potential of the entire Plot.<br>iii. The Authority, if required, shall allow the TDR for the unutilized FSI, if any (after deducting in-situ FSI), to be utilised as per TDR Regulations.<br>iv. Reservation may be allowed to be developed in parts with special permission of the commissioner subject to following conditions:-<br>a. Minimum area of such part shall be 25% of the total reservation.<br>b. The amenity to be handed over to the authority shall be planned in such way that an integrated amenity after development of entire reservation will be available to the authority.<br>OR<br>**For Bharat Mandapam**<br>A) The owner can develop Bharat Mandapam Amenity on 50% of the reservation land and utilize remaining 50% land for his own development as permissible under under the prevailing regulations for Residential and Commercial development.<br>B) The owner can develop Bharat Mandapam Amenity with development potential of 50% plot as per table 6G of Regn 6.2 considering this as separate plot.<br>C) The owner can develop remaining 50% of land considering this as an independent plot with potential as per table 6G of Regn. 6.2 or under any other applicable provisions. FSI advantage in lieu of 50% land to be developed as Bharat Mandapam Amenity shall not be allowed on the remaining 50% land used for development by the owner.<br>D) The owner can himself construct the Bharat Mandapam Amenity as per the design and specifications duly approved by the Authority and operate the same for the intended purpose. However, no benefit- either monetary or in the form of TDR shall be permissible to the owner. The Authority and the owner shall execute MOU regarding operation of the Amenity.<br>E) In future, if the owner desires to handover the Bharat Mandapam Amenity and the -uthority consents, then the owner is entitled to only TDR as mode of compensation for the land as per the then prevailing norms at the time of surrender. The owner shall not be entitled to any compensation for the construction of amenity, either TDR or monetary or any other form<br>F) Uses permissible shall be as listed in the National Strategy for MICE Industry 2022 in Section 2.2.8:<br>Provided that, maximum 30% of the total built-up area can be used for ancillary uses such as Hotels, Banquet venues etc.<br>The list of ancillary uses for successful implementation of this Reservation shall be finalised by the Municipal Commissioner of the planning authority with reasons recorded in writing. |

II. The following New Provision at Sr. No. (y) is proposed to be added at the end of Regulation No. 4.27 of Unified Development Control and Promotion Regulations (UDCPR) For Maharashtra State As Follows-
Regulation No. 4.27 USES PERMISSIBLE IN DEVELOPMENT PLAN RESERVATIONS
5) Combination of uses as mentioned below may be permissible with the permission of the Authority even if the reservation is for a specific purpose:
y) Bharat Mandapam / Convention Centre - Uses permissible shall be as listed in the National Strategy for MICE Industry 2022 in Section 2.2.8;
महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

सही/-
(प्रणव कर्पे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

### NOTICE
**Government of Maharashtra**
Urban Development Department
Mantralaya, Mumbai - 400 032
Dated: 23.03.2026

The Maharashtra Regional Town Planning Act, 1966
No.TPS-1825/179/CR-34/2025/ Bharat Mandapam /Convention Center/Notice/**UD-13** :- Whereas, the Government of Maharashtra has sanctioned the Unified Development Control and Promotion Regulations (UDCPR)(hereinafter referred to as "the said UDCPR Regulations") for the state except Municipal Corporation of Greater Mumbai, some Planning Authorities under the provisions of the Maharashtra Regional Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") vide Notification No.TPS-1818/CR.238/18/DP. & RP./Sec.37 (1AA) (c) & sec.20(4)/UD-13, dated 02/12/2020 and the said UDCPR regulations are come into force from dt.03.12.2020;
And whereas, the Government of Maharashtra vide Government Resolution No. TPS- 1825/179/C.R.34/2025/UD-13, dated 20.03.2025, had issued directives u/s 154 of the said Act (hereinafter referred to as "the said Directives") to submit a Comprehensive modification proposal w/s 37(1) of the said Act, for reserving the land admeasuring area at least 30 acres under the designation of "Bharat Mandapam" within the jurisdiction of seven Municipal Corporations in the State, on the basis of the Bharat Mandapam Cultural Centre;
And whereas, as per the said directives issued by the State Government dated 20.03.2025 w/s 154 of the said Act, the Government of Maharashtra is of the opinion that, it is necessary to incorporate two New Provisions - namely New Provision No. 8 (A) in Regulation No. 11.1 (Table No. 11A) and Regulation No. 4.27.5 (y)-into the said Regulations, with a view to proper development of "Bharat Mandapam / Convention Center" reservations in the sanctioned Development Plans of all Planning Authorities in the State, on the basis of the Bharat Mandapam Cultural Centre, (hereinafter referred to as "the said modification");
Now therefore, in exercise of the powers conferred under section 37(1AA)(a) and 20(3) of the said Act and all other powers enabling in that behalf, the Government hereby publishes a notice for inviting suggestions/objections from general public in respect to the said modification. Any objections/suggestions upon the said modification shall be forwarded, before the expiry of one month from the date of publication of this notice in Maharashtra Government Gazette, to the concerned Divisional Joint Director of Town Planning who is hereby authorised as "an Officer" to hear objections/suggestions and say of concerned Planning Authorities, as applicable, and submit his report to the Government (hereinafter referred to as "the said Officer").
This Notice is kept for inspection to the general public in the following offices for the period of one month on all working days.
1. The Divisional Joint Director of Town Planning, Konkan / Pune/ Nagpur / Nashik / Amravati/ Chhatrapati Sambhaji Nagar Division.
2. The Commissioners All concerned Municipal Corporations. (Except.Brihinmumbai Municipal Corporation)
3. The Collectors. All Districts.
4. The Metropolitan Commissioners, All Metropolitan Regions Developments Authorities.
5. Office of the Managing Director, CIDCO, CIDCO Bhavan, Belapur, Navi Mumbai.
6. Office of the Vice Chairman and Managing Director, Maharashtra Airport Development Company Ltd., 8 Floor, World Trade Centre, Mumbai-.5
7. The Chief Executive Officer, Kolhapur Urban Area Development Authority, Kolhapur.
8. All Special Planning Authorities New Town Development Authorities.
9. The Chief Executive Officer, All Zilla Parishads.
10. The Chief Officers, All Municipal Councils/ Nagar Panchyats.
This notice is also available on the Government website www.maharashtra.gov.in (Acts/Rules)
By order and in the name of the Governor of Maharashtra.

sd/-
(Pranav Karpe)
Deputy Secretary to Government

**Schedule-A**
**Accompaniment to the Government Notice No. TPS-1825/179/CR-34/2025/ Bharat Mandapam /Convention Center/ Notice/UD-13, dated :23.03.2026**
II. The following New Provision at Sr.No.11 A - **"Bharat Mandapam / Convention Centre"** is proposed to be added in Regulation No. 11.1 (Table No.11- A Sr.No.8 - Assembly & Institutional) of Unified Development Control and Promotion Regulations (UDCPR) For Maharashtra State As Follows-
**New Provision:-**
Regulation No. 11.1 (Table No.11- A Sr.No.8 - Assembly & Institutional)

| 8 (A) Assembly and Institutional | | |
|---|---|---|
| 1. Bharat Mandapam II. Convention Center | Planning Authority / Appropriate Authority / Owner | I In case of Bharat Mandapam, this reservation shall be proposed only in the jurisdiction of areas of the Municipal Corporations mentioned in the directives dt.20.03.2025 issued by the State Government u/s 154 of the MR & TP Act, 1966 and as amended by the State Government time to time.<br>II. For the Bharat Mandapam reservation, the area of the plot should be 30 acre or more.<br>III. For the Convention Centre reservation, the area of the plot should be 50,000 sq.mts or more.<br>IV. Appropriate Authority for development/ redevelopment of the said reservations shall be concerned Municipal Corporation / Maharashtra Tourism Development Corporation.<br>V. The Planning Authority/Appropriate Authority may acquire and develop the site for the same purpose.<br>OR<br>The Planning Authority/Appropriate Authority after acquiring the land lease it out - for developing and running or after developing itself, lease out for running it, as the case may be, as per the provisions of the Authorities' Act Act to a Registered Institution/Agency having requisite expertise in the field.<br>OR<br>The owner may be allowed to develop entire reservation for intended purpose according to the designs; specifications and conditions prescribed by the Authority.<br>OR<br>The Planning Authority or Appropriate Authorities may entrust the development, operation and maintenance of the entire reservation to an appropriate agency.<br>i. The Authority may allow the owner to develop the reservation, subject to handing over to the Planning Authority an independent plot along with constructed amenity of total area, mentioned in Note-1 below this table & as per norms prescribed by the Authority.<br>ii. The owner shall be entitled to develop remaining land for the uses permissible in adjoining zone with full permissible FSI of the entire Plot and permissible TDR potential of the entire Plot.<br>iii. The Authority, if required, shall allow the TDR for the unutilized FSI, if any (after deducting in-situ FSI), to be utilised as per TDR Regulations.<br>iv. Reservation may be allowed to be developed in parts with special permission of the commissioner subject to following conditions:-<br>a. Minimum area of such part shall be 25% of the total reservation.<br>b. The amenity to be handed over to the authority shall be planned in such way that an integrated amenity after development of entire reservation will be available to the authority.<br>OR<br>**For Bharat Mandapam**<br>A) The owner can develop Bharat Mandapam Amenity on 50% of the reservation land and utilize remaining 50% land for his own development as permissible under under the prevailing regulations for Residential and Commercial development.<br>B) The owner can develop Bharat Mandapam Amenity with development potential of 50% plot as per table 6G of Regn 6.2 considering this as separate plot.<br>C) The owner can develop remaining 50% of land considering this as an independent plot with potential as per table 6G of Regn. 6.2 or under any other applicable provisions. FSI advantage in lieu of 50% land to be developed as Bharat Mandapam Amenity shall not be allowed on the remaining 50% land used for development by the owner.<br>D) The owner can himself construct the Bharat Mandapam Amenity as per the design and specifications duly approved by the Authority and operate the same for the intended purpose. However, no benefit- either monetary or in the form of TDR shall be permissible to the owner. The Authority and the owner shall execute MOU regarding operation of the Amenity.<br>E) In future, if the owner desires to handover the Bharat Mandapam Amenity and the Authority consents, then the owner is entitled to only TDR as mode of compensation for the land as per the then prevailing norms at the time of surrender. The owner shall not be entitled to any compensation for the construction of amenity, either TDR or monetary or any other form<br>F) Uses permissible shall be as listed in the National Strategy for MICE Industry 2022 in Section 2.2.8:<br>Provided that, maximum 30% of the total built-up area can be used for ancillary uses such as Hotels, Banquet venues etc.<br>The list of ancillary uses for successful implementation of this Reservation shall be finalised by the Municipal Commissioner of the planning authority with reasons recorded in writing. |

II. The following New Provision at Sr. No. (y) is proposed to be added at the end of Regulation No. 4.27 of Unified Development Control and Promotion Regulations (UDCPR) For Maharashtra State As Follows-
**Regulation No. 4.27 USES PERMISSIBLE IN DEVELOPMENT PLAN RESERVATIONS**
5) Combination of uses as mentioned below may be permissible with the permission of the Authority even if the reservation is for a specific purpose:
y) Bharat Mandapam / Convention Centre - Uses permissible shall be as listed in the National Strategy for MICE Industry 2022 in Section 2.2.8;
By order and in the name of the Governor of Maharashtra.

sd/-
(Pranav Karpe)
Deputy Secretary to Government

क्रमांकः आरओसी-२०२६-२७/ क्र.५/सी १२८०

# एमपीएससी मुद्यावरून विधानभवनाच्या पायऱ्यांवर विरोधकांचे आंदोलन

■ मुंबई

**महाराष्ट्र** लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) विविध प्रलंबित प्रश्नांवरून विरोधकांनी आज विधान भवनाच्या पायऱ्यांवर जोरदार आंदोलन केले. हातात फलक घेऊन सरकारविरोधात घोषणाबाजी करत विरोधी पक्षाच्या आमदारांनी विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न मांडला. विधान भवन परिसरात झालेल्या या आंदोलनात विरोधकांनी एमपीएससीचा खेळ थांबवा, विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळू नका, या सरकारचा धिक्कार असो, अशा घोषणा दिल्या.

विरोधी पक्षाच्या नेत्यांनी राज्यातील हजारो स्पर्धा परीक्षा देणारे विद्यार्थी सध्या अनिश्चिततेच्या छायेत असल्याचा आरोप केला. भरती प्रक्रिया वेळेत पूर्ण होत नसल्याने आणि विविध निर्णय रखडल्याने उमेदवारांचे मोठे नुकसान होत असल्याचे त्यांनी म्हटले. काल विरोधकांनी शेतकरी कर्जमाफीचा मुद्दा लावून धरला होता. त्यानंतर आज एमपीएससीचा प्रश्न पुढे करत सरकारला घेरण्याचा प्रयत्न झाला. आंदोलनादरम्यान सरकारविरोधी घोषणांनी विधान भवन परिसर दणाणून गेला.

# मुलुंड मेट्रो दुर्घटना! कंत्राटदाराला ५ कोटी! सल्लागाराला १ कोटी दंड

■ मुंबई

**मेट्रो मार्ग**-४ प्रकल्पांतर्गत मुलुंड अग्निशमन केंद्राजवळ १३ फेब्रुवारी रोजी झालेल्या दुर्घटनेप्रकरणी कंत्राटदार आणि सल्लागारांवर कठोर कारवाई करण्यात आली आहे. कंत्राटदाराला ५ कोटी रुपयांचा, तर सल्लागाराला १ कोटी रुपयांचा दंड ठोठावण्यात आला असून, प्रकल्पाशी संबंधित तीन अभियांत्रिकी अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

या दुर्घटनेत मेट्रो व्हायाडक्टवरील कठडा तुटून खाली वाहनावर कोसळल्याने एका व्यक्तीचा मृत्यू झाला होता, तर तिघेजण जखमी झाले होते. या प्रकरणी विधान परिषदेत आमदार प्रसाद लाड यांनी जबाबदारी आणि कारवाईबाबत प्रश्न उपस्थित केला. यावर उत्तर देताना एकनाथ शिंदे म्हणाले की, या दुर्घटनेस जबाबदार ठरलेल्या मे. डी. बी. इंजिनिअरिंग अँड कन्सल्टिंग जीएमबीएच, हिल इंटरनॅशनल आयएनसी आणि लुईस बर्जर कन्सल्टिंग प्रा. लि. या सल्लागार कंपन्यांवर कारवाई करण्यात आली आहे. कंत्राट रद्द करण्याबाबत तसेच नवीन सल्लागार नियुक्तीबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. प्रकल्पाचे सुमारे ९० टक्के काम पूर्ण झाले असल्याने उर्वरित कामासाठी नवीन सल्लागार नेमणे व्यवहार्य नाही. त्यामुळे विद्यमान सल्लागारांनाच मुदतवाढ देण्यात आली आहे. दुर्घटनेनंतर प्रकल्पाच्या सुरक्षेची तपासणी करण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली होती. समितीच्या अहवालानुसार आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्यात आल्या असून, या प्रकरणी संबंधितांविरोधात पोलिसांत गुन्हा देखील दाखल करण्यात आला आहे.

# लाडकी बहीण योजनेत घोटाळा १२,४१५ शासकीय कर्मचारी लाभार्थी

■ मुंबई

**मुख्यमंत्री** माझी लाडकी बहीण योजनेत मोठा गैरप्रकार उघडकीस आला असून तब्बल १२,४१५ शासकीय महिला कर्मचाऱ्यांनी नियमबाह्य पद्धतीने या योजनेचा लाभ घेतल्याचे राज्य सरकारने मान्य केले. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी ही माहिती लेखी स्वरूपात सादर केली. सरकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे योजनेच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

आदिती तटकरे म्हणाल्या की, या योजनेअंतर्गत लाभार्थी महिलांची ओळख पडताळणी व प्रमाणीकरणासाठी ई-केवायसी (आधार प्रमाणीकरण) प्रक्रिया अनिवार्य करण्यात आली आहे. ही प्रक्रिया पूर्ण न करणाऱ्या लाभार्थ्यांचा लाभ थांबवण्यात आला आहे. तपासणीदरम्यान काही शासकीय महिला कर्मचाऱ्यांनीही अपात्र असूनही लाभ घेतल्याचे समोर आले. संबंधितांवर प्रशासकीय कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले असून, त्यांनी घेतलेली रक्कम वसूल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. याशिवाय, काही पुरुषांनीही या योजनेचा लाभ घेतल्याचे आढळून आले आहे. अशा सर्व प्रकरणांमध्ये लाभ तत्काळ बंद करण्यात आला असून, महसूल वसुली प्रक्रियेनुसार रक्कम परत मिळवण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# उष्माघाताने मृत्यू झाल्यासही मदत कृषिमंत्र्यांची विधानसभेत घोषणा

■ मुंबई

**राज्यातील** शेतकऱ्यांसाठी दिलासादायक घोषणा करत कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी शेतकरी अपघात योजनेत बदल केल्याचे सांगितले. वाढत्या तापमानामुळे उष्माघाताने मृत्यू झालेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबांनाही आता आर्थिक मदत दिली जाणार असून, शेतमजुरांचाही या योजनेत समावेश केला आहे. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी शेतीविषयक चर्चेला उत्तर देताना त्यांनी ही घोषणा केली. याचबरोबर ३० जूनपूर्वी ५६ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांची कर्जमाफी दिली जाईल, असेही त्यांनी सभागृहात सांगितले.

दत्तात्रय भरणे यांनी सांगितले की,मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनानुसार राज्यातील शेतकऱ्यांसाठी मोठ्या प्रमाणावर कर्जमाफीची अंमलबजावणी केली जाणार आहे. प्राथमिक अंदाजानुसार ५६ लाख २४ हजार शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांची कर्जमाफी दिली जाणार असून, ३० जूनपूर्वी यासंदर्भातील प्रक्रिया पूर्ण करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. शेतकरी संघटना आणि लोकप्रतिनिधींकडून आलेल्या सूचनांचाही सकारात्मक विचार केला जाईल. याशिवाय महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक' सादर करण्यात येणार आहे. यामध्ये शेतीत महिलांचे मोठे योगदान असून त्यांना स्वतंत्र ओळख, अधिकार आणि शासकीय योजनांचा अधिक लाभ मिळावा हा या विधेयकाचा उद्देश असणार आहे.त्याचबरोबर खरीप




# जे. जे. रुग्णालयातील कामे निधीअभावी रखडली



■ मुंबई

**भायखळा** मतदारसंघातील सर जे. जे. समूह रुग्णालयाच्या दुरुस्ती व नूतनीकरणाची कामे मंजूर होऊनही निधीअभावी रखडली असल्याचा मुद्दा उबाठाचे आमदार मनोज जामसुतकर यांनी विधानसभेत उपस्थित केला. तसेच औषध भंडारातील वातानुकूलन यंत्रणा बंद असल्यामुळे औषधसाठा खराब होत असून रुग्णसेवेवर गंभीर परिणाम होत असल्याचे त्यांनी सांगितले.

मनोज जामसुतकर म्हणाले की, सर जे. जे. समूह रुग्णालयाच्या दुरुस्ती व नूतनीकरणासाठी २०२३-२४ मध्ये मोठी कामे मंजूर करण्यात आली होती. ऑक्टोबर २०२४ मध्ये या कामांची वर्क ऑर्डरही काढण्यात आली. मात्र निधीअभावी अद्यापही ही कामे पूर्ण झालेली नाहीत. रुग्णालयातील अनेक कामेही निधीअभावी रखडलेली आहेत. शासनाकडून संबंधित ठेकेदार कंपनीला टप्प्याटप्प्याने निधी उपलब्ध करून दिला जात असल्यामुळे कामे वेळेत पूर्ण करण्यास अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे शासनाने जे. जे. समूह रुग्णालयाच्या दुरुस्ती व प्रलंबित कामांसाठी तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा. रुग्णालयातील औषध भंडारातील वातानुकूलन यंत्रणा बंद असल्यामुळेही विविध प्रकारच्या औषधांवर विपरीत परिणाम होत आहे.

# संजय गांधी उद्यानाच्या नामांतराचा विचार नाही

■ मुंबई

**बोरीवली** येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे नाव बदलून अटल बिहारी वाजपेयी राष्ट्रीय उद्यान करण्याबाबत राज्य सरकारचा कोणताही विचार नसल्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी विधान परिषदेत स्पष्ट केले. उद्यान परिसरात विद्यापीठ स्थापन करण्याचाही कोणताही प्रस्ताव सरकारच्या विचाराधीन नसल्याचे त्यांनी सांगितले.

काँग्रेसचे आमदार भाई जगताप यांनी हा मुद्दा विधान परिषदेत उपस्थित करत सरकारवर टीका केली. यावर उत्तर देताना वनमंत्री गणेश नाईक म्हणाले की, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे नाव बदलून अटल बिहारी वाजपेयी राष्ट्रीय उद्यान करण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाला होता.



# एफडीएत रिक्त पदे कधी भरणार? अतुल भातखळकरांचा सवाल

■ मुंबई

**एफडीएमधील** विविध पदांची भरती नेमकी कधी होणार, असा प्रश्न भाजपा आमदार अतुल भातखळकर यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे विधानसभेत उपस्थित केला. त्यावर महिन्याभरात ही पदे भरली जातील, असे उत्तर मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिले.

भातखळकर म्हणाले की, एफडीएतील रिक्त पदे भरण्याबाबत वेळोवेळी विधिमंडळात आवाज उठवण्यात आला आहे. मात्र, अद्यापही अनेक महत्त्वाची पदे रिक्त असून भरती प्रक्रिया संथ गतीने सुरू आहे. विधी अधिकारी आणि तांत्रिक सहाय्यक पदांसाठी जाहिराती प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. मात्र, ही भरती किती कालावधीत पूर्ण होणार, याबाबत सरकारने स्पष्ट भूमिका मांडावी. काही महिन्यांपूर्वी पायधुनीत कलिंगड खाल्ल्यानंतर एका कुटुंबातील चार सदस्यांचा मृत्यू झाले. त्या प्रकरणात नेमके कोणते विषारी द्रव्य कारणीभूत होते, याचा निष्कर्ष काढण्यात अन्न व औषध प्रशासन अपयशी ठरले. विषारी पदार्थांचे विश्लेषण करणारी अत्याधुनिक यंत्रणा एफडीएकडे उपलब्ध का नाहीत? हाफकिन संस्थेच्या कारभारावरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित करत नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांच्या अहवालातील आक्षेपांवर संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई होणार का? यावर उत्तर देताना झिरवाळ म्हणाले की, ड्रग इन्स्पेक्टर पदांच्या भरतीची प्रक्रिया महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे सुरू असून १ जुलै ते १७ जुलै २०२६ या कालावधीत परीक्षा आणि निकाल प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. त्यानंतर एका महिन्याच्या आत ही पदे भरली जातील.

# आंबेनळी घाटातील कामांना गती देण्याचे आश्वासन

■ मुंबई

**कोकण** आणि पश्चिम महाराष्ट्राला जोडणाऱ्या आंबेनळी घाटातील वारंवार अपघात होतात. या पार्श्वभूमीवर घाटातील संरक्षण भिंती, रस्त्यांची रचना आणि आपत्कालीन यंत्रणांतील त्रुटींवर मविआचे अमीन पटेल, सुनील प्रभू आणि भाजपाचे सुधीर मुनगंटीवार या आमदारांनी सरकारला धारेवर धरले. यावर उत्तर देताना सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आंबेनळीसह राज्यातील महत्त्वाच्या घाटरस्त्यांवरील सुरक्षा उपाययोजना आणि आधुनिक यंत्रणा उभारण्याचे आश्वासन दिले. ते म्हणाले की, पोलादपूर ते प्रतापगड पायथ्यापर्यंतच्या रस्त्याचे एक पॅकेज मंजूर करण्यात आले आहे.

# अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार महिला आयोगाने मागवला अहवाल

■ भाईंदर

**मिरा रोड** मधील एका अल्पवयीन मुलीवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणात दोन आठवड्यात अहवाल सादर करण्याचे आदेश महिला आयोगाने काशिमिरा पोलिसांना दिले आहेत.

एका अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याचे प्रकरण शहरात गाजत आहे. या प्रकरणी मिरा-भाईंदर महापालिकेच्या महिला बाल कल्याण सभापती अनिता पाटील यांच्या भावाला अटक करण्यात आली आहे. यासंदर्भात विविध राजकीय पक्षांनी मोर्चे काढून पाटील यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती. पीडिता आणि तिच्या कुटुंबाला जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात आहेत. तसेच अनिता पाटील आपल्या पदाचा गैरवापर करून पोलीस तपासात अडथळा आणत असल्याचा आरोप शिवसेना शिंदे गटाने केला आहे. याबाबत महिला आयोगाकडे तक्रारही करण्यात आली होती.

# महावितरणचे अधीक्षक अभियंता सांगळे निलंबित

■ कल्याण

**स्मार्ट** मीटर लावण्यास विरोध करणारे पत्र अदानी कंपनीस वरिष्ठांना न कळवता परस्पर पाठवल्याच्या कारणास्तव महावितरणच्या पालघर मंडळ कार्यालयाचे अधीक्षक अभियंता सांगळे यांना निलंबित करण्यात आले आहे.

महावितरणच्या कोकण प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक यांच्या स्वाक्षरीने निलंबन आदेश नुकतेच जारी करण्यात आले.

निलंबित अधीक्षक अभियंता मदन सांगळे यांनी दोन दिवसांपूर्वी अदानी कंपनीस परस्पर पत्र पाठवून, यापुढे घरगुती ग्राहकाचे वीज मीटर पूर्व संमतीपत्र न घेता परस्पर बदलल्यास, यातून होणारे वाद, आंदोलन झाल्यास याची जबाबदारी आपल्यावर राहील, असे नमूद केले होते. केंद्रीय विद्युत प्राधिकरण, भारत सरकारचे राजपत्र, तसेच मुख्य कार्यालयाकडून देण्यात आलेल्या सुचनेनुसार भारतीय वीज कायदा २००३ कलम ५५ नुसार वीज ग्राहकांना दोष रहित वीज मीटरची जोडणी देऊन अचूक वापराची नोंद ठेवणे ही वीज वितरण कंपनीने स्वतःहून अंमलबजावणी करण्याची बाब आहे. मात्र अधीक्षक अभियंता मदन सांगळे यांनी परस्पर पत्र लिहून बेशिस्त वर्तन केले. यामुळे त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

# भारताला जागतिक बँकेकडून १२,५०० कोटींचे कर्ज मंजूर




■ नवी दिल्ली

**जागतिक** बँकेच्या कार्यकारी संचालक मंडळाने भारतातील खासगी क्षेत्राच्या नेतृत्वाखालील रोजगार निर्मिती आणि शाश्वत आर्थिक विकासाला गती देण्यासाठी १.५ अब्ज डॉलर्स म्हणजे सुमारे १२,५०० कोटी रुपये कर्जास अधिकृत मंजुरी दिली आहे. आगामी दोन दशकांत श्रम बाजारपेठेत प्रवेश करणाऱ्या सुमारे १.१ कोटी भारतीय तरुणांसाठी चांगल्या रोजगाराच्या संधी निर्माण करणे हा या निधीचा मुख्य उद्देश आहे.

जागतिक बँकेने काल जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, हा कार्यक्रम भारताने अलीकडच्या वर्षात राबविलेल्या विविध आर्थिक सुधारणांवर आधारित आहे, यामध्ये करप्रणालीचे सुलभीकरण, व्यापार सुलभता, नियामक सुधारणा आणि व्यवसाय सुलभतेसाठी केलेल्या उपाययोजनांचा समावेश आहे. ही आर्थिक मदत खासगी क्षेत्रातील रोजगारनिर्मितीला प्रोत्साहन देणाऱ्या कार्यक्रमांतर्गत दिली जाणार आहे. जागतिक बँकेच्या अंदाजानुसार, पुढील दोन दशकांत भारताच्या कामगार शक्तीत (वर्कफोस) सुमारे १.२ कोटी युवक सहभागी होणार आहेत.

# सारवरोलीजवळ जंगलात आढळला मानवी सांगाडा

■ रत्नागिरी

**खेड** तालुक्यातील साखरोली गावानजीकच्या जंगल परिसरात पहाटे अज्ञात व्यक्तीचा मानवी सांगाडा आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला असून, मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नाही.साखरोली परिसरातील जंगल भागात काही नागरिकांना मानवी सांगाडा दिसून आला. त्यांनी तत्काळ पोलिसांना याबाबत माहिती दिली.

# बिल्डर दिवाळखोरीत असला तरी रहिवाशांना 'डिम्ड कन्व्हेअन्स'

**उच्च न्यायालयाचा निर्णय**

■ मुंबई

**प्रवर्तक** किंवा विकासक कंपनीविरुद्ध राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणात दिवाळखोरीची प्रक्रिया सुरू असली तरी ती रहिवाशांच्या हक्कांच्या आड येऊ शकत नाही, असा महत्त्वपूर्ण निर्णय उच्च न्यायालयाने दिला. दिवाळखोरीच्या प्रक्रियेमुळे सक्षम प्राधिकरणाला मोफा कायद्यांतर्गत 'डिम्ड कन्व्हेअन्स' मंजूर करण्यापासून रोखता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. बोरिवली पश्चिमेकडील 'दर्शन मंदिर को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी'च्या याचिकेवर सुनावणी घेऊन न्या. संदीप मारणे यांच्या एकलपीठाने हा निर्णय दिला. सोसायटीने उपनिबंधकांकडे डिम्ड कन्व्हेअन्ससाठी अर्ज केला होता. मात्र जमिनीशी संबंधित असलेल्या मेसर्स वास इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड या कंपनीविरुद्ध कॅनरा बँकेच्या अर्जावरून दिवाळखोरीची कारवाई सुरू झाली होती आणि मॉरॅटोरियम (स्थगिती) लागू करण्यात आली होती. त्यामुळे आयआरपीने डिम्ड कन्व्हेअन्सला विरोध केला. जिल्हा उपनिबंधकांनी ४ सप्टेंबर २०२५ रोजी आयआरपीचा आक्षेप मान्य करत सोसायटीचा अर्ज फेटाळला होता. त्या आदेशाला सोसायटीने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते.

# धाराशिवमध्ये विकासनिधीवरून आमदार-खासदारांमध्ये श्रेयवाद

■ धाराशिव

**धाराशिव** शहरातील विविध विकासकामांसाठी मंजूर झालेल्या निधीवरून भाजपा आमदार राणाजगजितसिंह पाटील आणि शिंदे गटात प्रवेश केलेले खासदार ओमराजे निंबाळकर यांच्यात श्रेयवाद रंगला आहे.

खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या खासदार निधीतील अखर्चित रकमेची चर्चा सुरू असतानाच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून धाराशिवमधील विविध विकासकामांसाठी तब्बल १८ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाल्याची माहिती निंबाळकर यांनी फेसबुक पोस्टद्वारे दिली. या निधीसाठी केलेल्या पाठपुराव्यामुळे शहराच्या विकासाला गती मिळणार असल्याचा दावा त्यांनी केला.

दुसरीकडे, शहरातील विविध विकासकामांसाठी राज्य सरकारकडून निधी मंजूर झाल्याबद्दल आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनीही फेसबुक पोस्ट करत सरकारचे आभार मानले. हा निधी मंजूर होण्यासाठी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आल्याचे त्यांनी नमूद केले.एकाच विकासनिधीवरून दोन्ही नेत्यांनी श्रेय घेण्याचा प्रयत्न केल्याने धाराशिवच्या राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

# अवचितगडावर सापडल्या दोन शिवकालीन तोफा!

रायगड- जिल्ह्यातील रोहा तालुक्यात असलेल्या ऐतिहासिक अवचितगडावर तब्बल ६०० ते ७०० फूट खोल दरीत शतकांपासून दडलेल्या दोन शिवकालीन तोफा सापडल्या आहेत.या तोफा सुखरूप बाहेर काढण्यात इतिहासप्रेमींना यश आले आहे.शिवशंभू प्रतिष्ठान आणि सह्याद्री वन्यजीव रक्षक यांच्या संयुक्त पथकाने ही अत्यंत खडतर आणि थरारक मोहीम फत्ते केली. या दोन ऐतिहासिक तोफांमुळे गडावरील एकूण तोफांची संख्या आता पाच झाली आहे.गेली १५ वर्षे अवचितगडाच्या संवर्धनासाठी आणि स्वच्छता मोहिमेसाठी शिवशंभू प्रतिष्ठान झटत आहे.

# नागपूर पोलीस आयुक्तपदी नांगरे-पाटील! सिंघल 'एसीबी'त

■ नागपूर

**राज्य** शासनाने वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांमध्ये महत्त्वाचा निर्णय घेत नागपूर शहराच्या पोलीस आयुक्तपदी ज्येष्ठ आयपीएस अधिकारी विश्वास नांगरे-पाटील यांची नियुक्ती केली. तर विद्यमान पोलीस आयुक्त रवींद्र कुमार सिंघल यांची बदली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) अप्पर पोलीस महासंचालकपदी केली आहे. गृह विभागाने यासंदर्भातील अधिकृत आदेश जारी केले.

शासनाच्या आदेशानुसार, सध्या एसीबीमध्ये अपर पोलीस महासंचालक म्हणून कार्यरत असलेले विश्वास नांगरे-पाटील आता नागपूर शहराच्या पोलीस आयुक्तपदाची धुरा सांभाळणार आहेत. दुसरीकडे, नागपूरचे विद्यमान पोलीस आयुक्त डॉ. रविंद्रकुमार सिंघल यांना एसीबीच्या अप्पर पोलीस महासंचालकपदी नियुक्त करण्यात आले आहे. नागपूरमधील त्यांच्या कार्यकाळात विविध गुन्हेगारीविरोधी मोहिमा, वाहतूक व्यवस्थापन आणि कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती.

# संत तुकोबांच्या पालखीला चांदी लावण्याचे काम सुरू

■ देहू

**जगद्गुरु** संत तुकाराम महाराज यांच्या ३४१ व्या आषाढी पायी वारी सोहळ्यात यंदा नवीन चांदीचा रथ सिद्ध करण्यात येत असून, त्याचे लाकडी नक्षीकाम पूर्ण झाले. आता लाकडी रथाला चांदी लावण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.

या रथासाठी २५० किलो चांदीचा वापर त्यासाठी करण्यात येणार आहे. पुण्यातील कोंढवा येथील सुरेश मिस्त्री आणि त्यांचे १० कारागीर चांदी लावण्याचे काम करत आहेत. राजस्थान येथील सुमेरपूर येथून बर्मा टिक सागवण लाकूड खरेदी करून वापरण्यात आले.नवीन रथ निर्मितीसाठी साधारणतः



१५० घनफूट लाकूड वापरण्यात आले. त्यावर अत्यंत सुबक व कलात्मक कोरीव नक्षीकाम करण्यात आले. रथावरील नक्षीकाम दाक्षिणात्य स्थापत्यशैलीवर आधारित असून, विविध धार्मिक आणि सांस्कृतिक प्रतिकृतींमुळे रथ अधिक देखणा अन् भव्य बनत आहे.

# आर्थिक चणचण असतानाही बेस्ट घेणार १५०० मिडी बसेस

**साडेसात हजार कोटींच्या खर्चाला दिली मंजुरी**

■ मुंबई

**आपल्याच** सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची देणी देताना पैशाची चणचण भासत आहे. नवीन भाडेतत्त्वावर बसेस घेणे अवघड जात आहे. त्यातच आता 'बेस्ट'ने केंद्र सरकारच्या पंतप्रधान ई-बस सेवाअंतर्गत १२ वर्षांच्या भाडेतत्त्वावर १५०० नवीन एसी मिडी इलेक्ट्रिक बसेस घेण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी साडेसात हजार कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे बेस्ट समितीच्या बैठकीत सदस्यांनी आक्षेप घेत प्रशासनाला धारेवर धरले. तरीही बैठकीत या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली.

काही सदस्यांनी आधीच आर्थिक परिस्थिती ठीक नसताना भाडेतत्त्वावर बसेस घेण्यासाठी एव्हढा पैसा कुठून आणणार, असा सवाल उपस्थित केला. त्यावेळी समिती अध्यक्ष तृष्णा विश्वासराव यांनी या प्रस्तावाबाबत सविस्तर माहिती पुढील बैठकीत द्यावी, असे निर्देश दिले. या १५०० बसेस १५ वर्षांसाठी भाडेतत्त्वावर घेण्यासाठी केंद्र सरकारकडून आर्थिक सहाय्य मिळणार आहे. यामध्ये सीईएसएलने ग्रीनसेल मोबिलिटी आणि पिनॅकल मोबिलिटी सोल्युशन्स प्रा.लि.यांच्या नेतृत्वाखालील संयुक्त उपक्रमाकडून १,०५० बसेससाठी निविदा स्वीकारल्या,तर उर्वरित ४५० बसेस साई ग्रीन प्रोजेक्ट्स प्रा. लि. आणि साई ग्रीन मोबिलिटी प्रा. लि. यांच्या संयुक्त उपक्रमाद्वारे चालवल्या जातील.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# अर्थकारणातला सायबर दहशतवाद

देशाचे ग्रोथ इंजिन म्हटल्या जाणाऱ्या महाराष्ट्रात सायबर गुन्हेगारीचा वाढता आलेख म्हणजे आर्थिक राजधानी लाभलेल्या महाराष्ट्राचा पुरेपूर फायदा उठवण्याचाच प्रकार म्हणावा लागतो. वर्षभरामध्ये तब्बल दहा हजारावर सायबर गुन्हे झाले. त्यामध्ये २ हजार ३७९ लोकांना अटक केली गेली. आणि तब्बल १ हजार ४१० कोटींची फसवणूक केली गेली. केंद्रीय गृहमंत्रालयाच्या आकडेवारीप्रमाणे सर्वाधिक गुन्हे दाखल होण्याचे प्रमाण महाराष्ट्रात आहे. नागपूर, मुंबई, पुण्यात सर्वाधिक गुन्हे नोंदले गेले. देशभरात तेलंगणा राज्य जरी सायबर गुन्हेगारीत पहिल्या क्रमांकावर असले तरीसुद्धा कॉर्पोरेट सायबर खंडणीचा प्रकार महाराष्ट्रात सर्वाधिक प्रमाणात घडतो. म्हणजेच इथल्या उद्योग क्षेत्रामध्ये तंत्रज्ञानाचा वापर करून इथली सायबर गुन्हेगारी वाढते आहे. त्यासोबत सामान्य माणसालादेखील डिजिटल अरेस्ट तसेच खोटे कॉल करून बँकेची माहिती घेतली जाते. आणि खात्यातून पैसे काढून घेण्याचे प्रकार घडतात. ज्यामध्ये ज्येष्ठ नागरीकांची सर्वाधिक फसवणूक होत असल्याचेही आढळून आले आहे. पुणे आणि नागपूरमध्ये हे प्रकार सर्वाधिक होतात. यापूर्वी घरफोड्या किंवा चोऱ्यामाऱ्या करून पैसे, दागिने लांबवण्याचे प्रकार होत असत. त्याची वर्षभरातली रक्कम पाच पन्नास कोटीच्या वर जात नव्हती. पण या सायबर गुन्हेगारीने असा काही हैदोस घातला की, राज्यात वर्षभरात तब्बल एक हजार कोटींना चुना लावला गेला. दहा हजारावर गुन्हे घडतात. ही काही साधारण गोष्ट ठरत नाही. एकट्या मुंबईत ४ हजार ८२५ सायबर गुन्हे घडले. यासंदर्भात भलेही २ हजार ३७९ आरोपींना अटक झाली असली तरीसुद्धा या गुन्हेगारांचा शोध लागलेला नाही. आणि ती रक्कम वसुलही करता आलेली नाही. त्याचे एकूण प्रमाण हे १० हजार गुन्ह्यांपेक्षा जास्त होऊ शकते. आणि पोलिसांपर्यंत न पोहोचलेल्या गुन्ह्यांचा विचार केला तर १ हजार कोटीपेक्षा जास्त रकमेची फसवणूक झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

### ग्रोथ इंजिनमधील सायबर गुन्हे

विधिमंडळ अधिवेशनामध्ये गृहखात्याची जबाबदारी असलेल्या मुख्यमंत्र्यांनीच सायबर गुन्हेगारीचे हे थैमान वाढत असल्याची कबुली दिली. ती रोखण्यासंदर्भात महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प कार्यान्वित केला गेल्याचे त्यांनी म्हटले आहे. त्यातला सर्वात धक्कादायक आणि धोकादायक भाग म्हणजे जगाच्या कुठल्याही कानाकोपऱ्यातून ही सायबर गुन्हेगारी करता येते. विशेषतः भारताचा विचार केला तर पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, कर्नाटक, दिल्ली या भागातले गुन्हेगार ऑनलाईन संपर्क साधून लोकांना फसवत असतात. यापैकी कुठल्याही गुन्हेगाराचा निश्चित पत्ता उपलब्ध होत नाही. कारण त्यांच्याकडून सतत मोबाईल नंबर बदलले जातात. अगदी ई-मेलच्याबाबतीतही बदलते पासवर्ड आणि वेगवेगळ्या ठिकाणावरून गुन्हेगारी सुरू राहते. या आरोपींच्या खात्यात जमा होणारी रक्कम देखील पुढच्या काही तासामध्ये काढून घेतली जाते. अत्यंत चलाखीने आणि तंत्रज्ञानाचा वापर करूनच देशभरात किमान सत्तर ते पंच्याहत्तर हजार कोटींची लूट सुरू आहे. आतापर्यंतच्या वेगवेगळ्या गुन्हेगारी प्रकारांचा विचार केला तरी इतक्या प्रचंड प्रमाणात लूट करणारी ही धोकादायक गुन्हेगारी ठरली आहे. आज महाराष्ट्रासारख्या आर्थिकदृष्ट्या प्रगत असलेल्या राज्यात सायबर गुन्हेगार वेगळं तंत्र वापरून कॉर्पोरेट क्षेत्रातदेखील आपली दहशत निर्माण करीत आहेत. रिझर्व्ह बँकेकडून या सायबर गुन्हेगारी संदर्भात काही मार्गदर्शक सूचना सगळ्या बँकांना केल्या आहेत. त्या विशिष्ट प्रकारच्या यंत्रणांचे कार्य असूनदेखील सायबर गुन्हेगारीला लगाम बसू शकलेला नाही. याचा अर्थ ज्या पद्धतीचे तंत्रज्ञान सायबर गुन्हेगारांकडून वापरले जाते तशा प्रकारचे गुन्हे शोधणारे तंत्र केंद्र आणि राज्य सरकारला वापरता आलेले नाही. परंतु या गुन्हेगारीमध्ये भरडला जाणारा मध्यमवर्गीय आणि अतिशय कमी वेळात कमी श्रमात होणारी हजारो कोटींची लूट देशाच्या अर्थव्यवस्थेपुढचेसुद्धा मोठे संकट ठरते. किंबहुना आर्थिक क्षेत्रातला हा सर्वात मोठा सायबर दहशतवादच म्हणावा लागतो. याचे स्वरूप जर लक्षात घेतले तर दहशतवाद रोखण्यासाठी ज्या पद्धतीच्या योजना केल्या गेल्या त्या पद्धतीचा सायबर दहशतवादविरोधी स्क्वाड गरजेचा ठरतो. ज्यामध्ये बदलत्या तंत्रज्ञानाचा अभ्यास आणि देशभरातल्या सगळ्या तपास यंत्रणांच्या समन्वयातून या गुन्हेगारांच्या मुसक्या बांधता येऊ शकतात.

### जनजागृतीबरोबर तंत्रज्ञान हवं

ज्या वेगाने हा सायबर दहशतवाद फोफावतो आहे त्यामागचे प्रमुख कारण म्हणजे समाजामध्ये तंत्रज्ञानाची निरक्षरता आहे. त्याचा गैरफायदा घेऊन ही गुन्हेगारी सहजपणे केली जाते. पोलीस तपास यंत्रणांच्या आणि सायबर तज्ज्ञांच्या म्हणण्याप्रमाणे लोकांमधली जनजागृतीसुद्धा तितकीच महत्त्वाची आहे. सातत्याने प्रसार माध्यमांमधून किंवा मोबाईलवरून सायबर गुन्हेगारांना ओळखण्याच्या खाणाखुणा सांगितल्या गेल्या पाहिजेत. त्यांच्या कोणत्याही जाळ्यात सामान्य माणूस फसणार नाही, अशा प्रकारच्या मार्गदर्शक सूचना वारंवार देण्याची आवश्यकता आहे. मुंबई-पुण्यासारख्या महानगरात याचे प्रमाण वाढत असेल तर अगदी शाळा-महाविद्यालयांपासून ते गृहनिर्माण संस्थांमध्ये सायबर जनजागृतीची मोहीम राबवली गेली पाहिजे. दहशतवादाइतकेच हे संकट गंभीर आहे. सामान्य माणसाच्या कष्टाचा पैसा अगदी सहजपणाने नाहीसा करणारा हा प्रकार म्हणजे अनेकांचे जीवनच संपुष्टात आणणारा ठरतो. कारण आयुष्यभराच्या पुंजीचा काही मिनिटामध्ये हे गुन्हेगारी पोबारा करतात आणि अनेकांपुढे आपल्या भवितव्याचे संकट उभे राहते. अशा गुन्हेगारीपासून भरपाई देणारे कोणतेच विमाकवच आज तरी उपलब्ध नाही. म्हणूनच या गुन्हेगारीचा चाणाक्षपणा हा भल्या भल्यांना नामोहरम करणारा ठरला आहे. आतापर्यंत संघटित गुन्हेगारी धुमाकूळ घालत असेल. परंतु सायबर गुन्हेगारी संघटित हा प्रकार फारसा नाही. अगदी व्यक्तिगत पातळीवर तंत्रज्ञानाच्या युक्त्या-प्रयुक्त्या माहिती असलेली व्यक्ती ही सायबर दरोडेखोरी ठरू शकते. लोकांची जनजागृती करत असताना तितक्याच उच्च तंत्रज्ञानाच्या वापरातून ही गुन्हेगारी रोखावी लागेल. ग्रोथ इंजिन असलेल्या महाराष्ट्रात सायबर गुन्हेगारीचीही ग्रोथ होत आहे.

**सुविचार**

**विलास कोळेकर**
**मालेवाडी, जि. सांगली.** मोबा.९४२२४२०६११

सामर्थ्य आणि सुख जितके गुप्त ठेवावे, तितके ते जास्त काळ टिकते. कारण झाकली मूठ सव्वा लाखाची असते. ज्या दिवशी ती जगासमोर उघडली जाते, त्या दिवशी तिचे मूल्य आणि कुतूहल दोन्ही संपून जाते.

**पंचांग**



**गुरुवार, २५ जून २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**
*** निज ज्येष्ठ शुक्ल एकादशी**
**नक्षत्र : स्वाती**
**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० तूळ**

रवी उदय- ०६-०४
रवी अस्त- १९-१८

**निर्जला एकादशी**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

# इंग्लंड घानाविरुद्ध अपेक्षित विजय मिळवण्यात अपयशी

**फॉक्सबरो** - बॉस्टन स्टेडियम येथे पार पडलेल्या फिफा विश्वचषकच्या सामन्यात इंग्लंडला घानाविरुद्ध अपेक्षित विजय मिळवण्यात अपयश आले. ग्रुप एलमधील या सामन्यात दोन्ही संघांनी ०-० अशी गोलशून्य बरोबरी साधली. अनेक संधी निर्माण करूनही इंग्लंडला एकही गोल करता आला नाही. ग्रुप एलच्या गुणतालिकेत इंग्लंड पहिल्या आणि घाना दुसर्या स्थानावर आहे. त्यामुळे दोन्ही संघ विश्वचषकाच्या शर्यतीत कायम आहेत. सामन्यात इंग्लंडचे वर्चस्व स्पष्टपणे दिसून आले. संघाने तब्बल १९ शॉट्स मारले, तर घानाला केवळ दोनच संधी मिळाल्या.

## इंग्लंडमध्ये सूर्यवंशीला वेगळा ड्रेसिंग रूम

**लंडन-** आयसीसी आणि ईसीबीच्या १६ वर्षांखालील खेळाडूंसाठी असलेल्या सुरक्षा नियमांनुसार १५ वर्षीय सलामीवीर वैभव सूर्यवंशीला इंग्लंडमध्ये होणाऱ्या आगामी टी२० मालिकेदरम्यान त्याच्या भारतीय संघातील इतर सहकाऱ्यांपासून वेगळी असलेली स्वतःची ड्रेसिंग रूम वापरावी लागेल. १५ वर्षीय सूर्यवंशीला सामन्यांत आणि संघसोबत चर्चेसाठी भारतीय ड्रेसिंग रूममध्ये प्रवेश दिला जाईल, परंतु कपडे बदलताना त्याला वेगळ्या ड्रेसिंग रूमचा वापर करावा लागेल. इंग्लंडमधील मालिकेपूर्वी आयर्लंडमध्ये होणाऱ्या भारताच्या दोन टी-२० सामन्यांसाठी हा नियम लागू होईल की नाही, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.




# कोलंबिया सलग दुसऱ्या विजयासह बाद फेरीत दाखल

■ ग्वादालहारा

**डॅनियल** मुनोजच्या निर्णायक गोलच्या जोरावर कोलंबियाने काँगोचा १-० असा पराभव करत विश्वचषकाच्या बाद फेरीत प्रवेश केला. या विजयासह कोलंबियाने 'के' गटात आपले स्थान अधिक भक्कम केले असून, त्यांचा विजयी रथ अविरत सुरू आहे. स्पर्धेतील हा डॅनियल मुनोजचा दुसरा गोल असून यासाठी त्याला 'सामनावीर' म्हणून गौरवण्यात आले. सामन्याच्या सुरुवातीपासूनच कोलंबियाने आक्रमक पवित्रा घेतला होता. मात्र, काँगोचा गोलरक्षक लिओनेल म्पासीने पहिल्या २० मिनिटांत केलेले ५ अप्रतिम बचाव कोलंबियाच्या विजयातील मोठा अडथळा ठरले होते. अखेर ७६ व्या मिनिटाला मुनोजने गोल करत हा कोंडी फोडली. एका बचावपटूला लागून दिशा बदललेला चेंडू मुनोजने डाव्या पायाने नेटमध्ये धाडला. सामन्याच्या उत्तरार्धात कोलंबियाचा स्टार फॉरवर्ड लुईस डियाझचे २ गोल तांत्रिक कारणास्तव (फाऊल आणि ऑफसाईड) रद्द करण्यात आले. दुसरीकडे काँगोने शेवटच्या मिनिटांपर्यंत चिवट झुंज दिली. स्टॉपेज टाइममध्ये काँगोला बरोबरी साधण्याच्या दोन सुवर्णसंधी मिळाल्या होत्या, परंतु कोलंबियाचा गोलरक्षक कॅमिलो व्हार्गासने नॅथॅनियल म्बुकूचा लांबून मारलेला फटका आणि चॅन्सेल म्बेम्बाचे हेडर रोखून संघाचा विजय निश्चित केला.

**२६ जूनचे सामने**

| भारतीय वेळ | संघ |
|---|---|
| पहाटे १:३० | कुरासाओ विरुद्ध आयव्हरी कोस्ट |
| पहाटे १:३० | इक्वेडोर विरुद्ध जर्मनी |
| पहाटे ४:३० | ट्युनिशिया विरुद्ध नेदरलँड्स |
| पहाटे ४:३० | जपान विरुद्ध स्वीडन |
| सकाळी ७:३० | तुर्की विरुद्ध अमेरिका |
| सकाळी ७:३० | पॅराग्वे विरुद्ध ऑस्ट्रेलिया |

# पनामा विश्वचषकाच्या शर्यतीतून बाहेर क्रोएशियाचा १-० ने संघर्षमय विजय

■ टोरोंटो

**टोरोंटो** स्टेडियमवर झालेल्या अत्यंत चुरशीच्या सामन्यात क्रोएशियाने पनामाचा १-० असा पराभव करुन विश्वचषकाच्या बाद फेरीतील आपले आव्हान जिवंत ठेवले. या विजयासह क्रोएशियाने गुणतालिकेत आपली स्थिती मजबूत केली आहे. पनामाचा हा सलग दुसरा पराभव असून ते स्पर्धेतून बाहेर पडले.

सामन्याच्या पहिल्या हाफमध्ये पनामाच्या अभेद्य बचावफळीसमोर क्रोएशियाला संघर्ष करावा लागला. मात्र, दुसऱ्या हाफमध्ये प्रशिक्षक झ्लात्को दालिच यांनी रणनीतीत बदल करत अतिरिक्त फॉरवर्ड मैदानात उतरवला. या निर्णयाचा फायदा अवघ्या ४ मिनिटांत दिसून आला. ५४ व्या मिनिटाला जोसिप स्टानिसिचने उजव्या बाजूने दिलेल्या अचूक क्रॉसवर ंटे बुदिमिरने टॅप-इन करत क्रोएशियाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. त्यानंतर पनामाच्या खेळाडूंनी सामन्यात चिवट झुंज दिली.

**महावितरण** | **ई-निविदा सूचना**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**

स्थापत्य विभाग, महावितरण कल्याण कार्यालयाच्या अंतर्गत असणाऱ्या विविध प्रकारच्या स्थापत्य कामाकरिता ई-निविदा क्र. ०७, ०८, ०९, १०, ११, १२, १३, १४, १५, १६, १७ व १८ (२०२६-२७) अश्या एकूण बारा निविदा महावितरण कंपनीच्या www.mahadiscom.in या e-Tender च्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहे. सदर निविदा विक्रीसाठी **दि. २६.०६.२०२६ पासून ते दि. ०२.०७.२०२६** पर्यन्त उपलब्ध राहतील व निविदा भरण्याची अंतिम तारीख **दि. ०३.०७.२०२६ ला दुपारी १२.०० वाजेपर्यंत** आहे. निविदेच्या आवृतीत/तारखा/ इ. कोणताही बदल झाल्यास शुद्धिपत्रक यापुढे आमच्या वेबसाईटवर प्रकाशित केले जाईल.

सही
**कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य विभाग कल्याण**

**महावितरण** | **ई-निविदा सूचना**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**

स्थापत्य विभाग, महावितरण, भांडुप कार्यालय अंतर्गत असणा-या विविध प्रकारच्या स्थापत्य कामांकरिता टी-३०, टी-३१, टी-३२, टी-३३, टी-३४, टी-३५, टी-३६ आणि टी-३७ (२०२६-२७ 3rd Call) अशा एकुण **आठ** निवीदा महावितरण कंपनीच्या www.mahadiscom.in या e-Tender च्या संकेतस्थाळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निवीदा विक्रीसाठी **दि. २५.०६.२०२६ पासून ते दि. ०१.०७.२०२६ @ १३.००** वाजेपर्यंत उपलब्ध राहतील व निवीदा भरण्याची अंतिम तारीख **दि. ०१.०७.२०२६** ला **१५.००** वाजेपर्यंत आहे. निवीदेच्या आवृत्तीत/तारखा/ इ. कोणताही बदल झाल्यास, शुध्दीपत्र यापुढे आमच्या वेबसाईवर प्रकाशित केले जाईल. (सही)

**कार्यकारी अभियंता (स्था.) स्थापत्य विभाग भांडुप**

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**ई-निविदा सुचना क्र. २६/२०२६**

खालील कामांसाठी म.औ.वि.महामंडळ नोंदणीकृत ठेकेदारांकडून मोहोरबंद ई-निविदा मागवित आहे. सदर ई-निविदा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होतील.

| अ. क्र. | कामांचे नांव | अंदाजित रक्कम रुपये | कोरी ई-निविदा उपलब्ध होण्याचा कालावधी |
|---|---|---|---|
| अ) | **का.अ., मऔविम, स्थापत्य विभाग, पुणे** | | |
| १ | रांजणगाव औद्योगिक क्षेत्र ....रस्ते देखभाल व दुरुस्ती. . औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांची साफसफाई करणे . सन २०२६ - २७ | ३९,६०,६४०/- | २५/०६/२०२६ ते १०/०७/२०२६ |
| २ | रांजणगाव औद्योगिक क्षेत्र... रस्त्याची देखभाल व दुरुस्ती.... A ब्लॉकमधील सेवा रस्त्याचे पुनः अस्तरीकरण करणे. | ३९,७९,७१०/- | २५/०६/२०२६ ते १०/०७/२०२६ |
| ब) | **का.अ., मऔविम, प्रकल्प विभाग, पुणे.** | | |
| १ | चाकण औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र.२.... रस्त्याची देखभाल व दुरूस्ती.... वर्षभरासाठी मुख्य रस्त्याची साफसफाई करणे. (पूर्व बाजू) | ३१,८०,४७८/- | २५/०६/२०२६ ते १०/०७/२०२६ |
| २ | चाकण औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र. २.... भूखंड क्र. A-२४/A कडे जाणाऱ्या अंतर्गत रस्त्याची पुनर्बांधणी करणे. (दुसरी मागणी) | ३९,७९,१००/- | २५/०६/२०२६ ते ०६/०७/२०२६ |
| क) | **का.अ., मऔविम, विवयां. विभाग, पुणे.** | | |
| १ | पिंपरी चिंचवड औद्योगिक क्षेत्र... पाणी पुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती... रावेत येथील चेक मिटरींग किऑस्कचे दुरूस्ती करून अद्यावतीकरण करणे. | ३,७०,१८१/- | २५/०६/२०२६ ते १०/०७/२०२६ |
| २ | रांजणगाव औद्योगिक क्षेत्र... पाणी पुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती . शुध्द व अशुध्द उर्ध्वजलवाहिनी आणि शुध्द पाणी पुरवठा वितरण यंत्रणांची गळती थांबविणे व सर्वसमावेशक वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे. | २१,७९,०७०/- | २९/०६/२०२६ ते १४/०७/२०२६ |
| ३ | हिंजवडी माहिती तंत्र उद्यान... पाणी पुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती. हिंजवडी माहिती तंत्र उद्यान येथे विविध ठिकाणी जुने सुचना फलक बदलवून त्या ऐवजी चमकणारे विद्युतीय सुचना फलक बसविणे. | ३३,९१,२५६/- | २९/०६/२०२६ ते १४/०७/२०२६ |
| ४ | पिंपरी चिंचवड औद्योगिक क्षेत्र... पाणी पुरवठा देखभाल व दुरूस्ती रावेत शुध्द जलप्रक्रिया केंद्र येथील एच टी / एल टी पॅनलची सर्वसमावेशक वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे. | ३४,३९,२००/- | २९/०६/२०२६ ते १४/०७/२०२६ |
| ५ | चाकण औद्योगिक क्षेत्र... टप्पा क्र ४ तळवडे ते चाकण टप्पा क्र १ प्रस्तावित मुख्य रस्त्यावरील मे. लिटन्स ऑटोमोटीव्ह (इंडिया) प्रा.लि. चाकण, निघोजे समोरील ओव्हरहेड उच्चदाब वाहिनीचे भुमिगत वाहिनीत रूपांतर करणे. | ३७,०४,२२५/- | २५/०६/२०२६ ते १०/०७/२०२६ |
| ६ | चाकण औद्योगिक क्षेत्र... टप्पा क्र २... पायाभुत सुविधा पुरविणे.. चाकण टप्पा क्र २ मधिल भुखंड क्र एक्स १ लगत पथदिवे पुरविणे, बसविणे आणि कार्यान्वित करणे. | ३८,१८,७९७/- | २५/०६/२०२६ ते १०/०७/२०२६ |
| ७ | रांजणगाव औद्योगिक क्षेत्र... पाणी पुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती ... पोलादी शुध्द उर्ध्वजलवाहिनीचे बिट्युमिनस वॉटर - मिसिबल इपॉक्सी ट्रीटमेंट वापरून मजबूतीकरण करणे. | ४०,००,३५९/- | २९/०६/२०२६ ते १४/०७/२०२६ |
| ८ | चाकण औद्योगिक क्षेत्र... टप्पा क्र. ५... पायाभूत सुविधा पुरविणे... चाकण टप्पा क्र. ५ मधील एच टी व एल टी लाईन शिफ्ट करणे. | २,६३,६४,०४५/- | २५/०६/२०२६ ते १०/०७/२०२६ |
| ड) | **का.अ., मऔविम, बारामती विभाग, बारामती.** | | |
| १ | जेजुरी औद्योगिक क्षेत्र... जेजुरी, लोणंद आणि फलटण औद्योगिक क्षेत्रातील क्लोरिन गळती प्रणालीची वार्षिक देखभाल दोन वर्षांच्या कालावधीसाठी करणे. | ९,२२,०५०/- | २५/०६/२०२६ ते १०/०७/२०२६ |
| २ | इंदापूर औद्योगिक क्षेत्र... पाणी पुरवठा योजना देखभाल व दुरूस्ती... डब्लूटीपी येथील पाणी पुरवठा वितरण प्रणालीचे संचालन व देखभाल आणि जॅकवेल व RWRM चे संचालन व देखभाल वर्ष २०२६-२७ साठी करणे. | ३०,५४,३२०/- | २५/०६/२०२६ ते १०/०७/२०२६ |
| इ) | **का.अ., मऔविम, कोल्हापूर विभागांतर्गत सातारा उपविभाग, सातारा.** | | |
| १ | सातारा व अतिरिक्त सातारा औद्योगिक क्षेत्र... रस्ते देखभाल व दुरूस्ती... औद्योगिक क्षेत्रातील अघातक घनकचरा संकलन करून सातारा नगरपरिषदेच्या सोनगाव घनकचरा प्रक्रिया केंद्रापर्यंत वाहतूक करणे व प्रक्रियेसाठी देणे. | २२,८४,०९०/- | २५/०६/२०२६ ते १०/०७/२०२६ |
| २ | सातारा औद्योगिक क्षेत्र... पाणी पुरवठा योजना देखभाल व दुरुस्ती... जलशुध्दीकरण केंद्र सातारा, वाई, कराड व खंडाळा (केसुर्डी) औद्योगिक क्षेत्र येथील क्लोरीनेटर्सचे सन २०२६-२०२७ साठी देखभाल व दुरुस्तीचे साहित्यासह काम करणे. | २४,४०,५४०/- | २५/०६/२०२६ ते १०/०७/२०२६ |
| ३ | सातारा औद्योगिक क्षेत्र... पाणी पुरवठा योजना देखभाल व दुरूस्ती... अशुध्द पाण्याची मुख्य पंपिंग वाहिनीच्या सातारा, कराड, वाई व पाटण येथील जॅकवेलवर बसविलेले MIFLOW इलेक्ट्रोमॅग्नेटीक फ्लोमीटरचे कॅलिब्रेशन तसेच सातारा, कराड, वाई येथिल जॅकवेलवर PEC MIBEL GSM आणि ऑनलाईन डेटा प्रणालीची (स्काडा) वार्षिक देखभाल करणे व संचलन करणे. | ४०,३३,८००/- | २५/०६/२०२६ ते १०/०७/२०२६ |

**जाहिर नोटीस**

याद्वारे सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की, (१) सौ. यास्मिन कॉन्ट्रॅक्टर, रा. मूव्ही टॉवर सीएचएस लि., प्लॉट क्र. ४१, ओशिवरा कॉम्प्लेक्स, यमुना नगर, अंधेरी (पश्चिम), मुंबई -४०००५३, (२) सौ. शहनाज रफी अहमद शेख, रा. फ्लॅट क्र. ७०२, सीगल - सी, कोरली रोड, रिझवी कॉलेजजवळ, वांद्रे (पश्चिम), मुंबई - ४०००५० आणि (३) सौ. शाहीन अब्दुल गनी बंबावाला, रा. फ्लॅट क्र. २३, न्यू ब्लू फ्लेम प्रीमायसेस को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड, एस. व्ही. रोड, वांद्रे (पश्चिम), मुंबई - ४०००५० यांनी खाली अनुसूचीमध्ये नमूद केलेली मालमत्ता माझे अशील श्री. आदिल अन्वर मिरजकर व सौ. नग्मा आदिल मिरजकर, रा. फ्लॅट क्र. १३ व १४, चौथा मजला, ब्लू फ्लेम अपार्टमेंट, ५१६, एस. व्ही. रोड, जामा मशिदीसमोर, वांद्रे (पश्चिम), मुंबई - ४०००५० यांना दिनांक १२.०५.२०२६ रोजी झालेल्या सामंजस्य करारानुसार (Memorandum of Understanding) विकण्याचे मान्य केले आहे.
सदर मालमत्ता अथवा तिच्या कोणत्याही भागावर विक्री, भेट, भाडेपट्टा, वारसा, अदलाबदल, गहाण, बोजा, तारण, विश्वस्त हक्क, ताबा, सुखभोग हक्क, जसी किंवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क, दावा अथवा हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीने त्यासंबंधीचे सर्व पुरावे व कागदपत्रांसह खाली सही करणाऱ्या अधिवक्त्यांकडे त्यांचे कार्यालय क्र. १२, स्पेस हाइट्स सीएचएस, प्लॉट क्र. ५३/५४, सेक्टर- ३४, कामोठे, नवी मुंबई ४१०२०९ येथे ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात कळवावे. अन्यथा सदर मालमत्तेबाबत कोणाचाही कोणताही दावा किंवा हरकत नाही असे गृहित धरून प्रस्तावित व्यवहार पूर्ण करण्यात येईल व त्यानंतर प्राप्त होणारा कोणताही दावा किंवा हरकत ग्राह्य धरली जाणार नाही व तो कायमचा माफ व रद्द समजण्यात येईल.

**मालमत्तेची अनुसूची**
ब्लू फ्लेम आपार्टमेंट न्यू ब्लू फ्लेम प्रिमायसेस को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड, नोंदणी क्र. BOM/GEN/1348 सन १९७९ मधील सहाव्या मजल्यावरील फ्लॅट क्र. २३, बांधकाम क्षेत्रफळ सुमारे ८४१ चौ. फूट, सी. टी. एस. क्र. अ/२३४/इ, गाव वांद्रे-अ, ता. अंधेरी, प्लॉट क्र. ५१६/ए, एस. व्ही. रोड, जामा मशिदीसमोर, वांद्रे (पश्चिम), मुंबई - ४०००५० येथील सर्व हक्क, स्वारस्य व मालकी असलेली मालमत्ता.
स्थळ : मुंबई
दिनांक : २४.०६.२०२६
कार्यालय क्र.१२, स्पेस हाइट्स सीएचएस, प्लॉट क्र. ५३/५४, सेक्टर- ३४, कामोठे, नवी मुंबई -४१०२०९.
e-mail - vinayakrao_patil@rediffmail.com

सही/-
**ॲड.श्री. विनायक पाटील**
**मोबाईल नंबर- [illegible]**

फॉर्म ए
जाहीर घोषणा
(इन्सॉल्व्हन्सी अँण्ड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (कॉर्पोरेट व्यक्तिंकरिता दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया) विनियमन, २०१६ चे विनियमन ६ अन्वये)

**मे. सुप्रिम इंजिनिअरिंग लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

| | संबंधित तपशिल | |
|---|---|---|
| १ | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव | मे. सुप्रिम इंजिनिअरिंग लिमिटेड |
| २ | कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना तारीख | २१.१२.१९८७ |
| ३ | ज्या प्राधिकरणाअंतर्गत कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना/नोंदणीकरण झाले आहे | कंपनी निबंधक, मुंबई |
| ४ | कॉर्पोरेट ऋणकोचे कॉर्पोरेट ओळख क्र./ मर्यादित दायित्व ओळख क्र. | L99999MH1987PLC043205 |
| ५ | कॉर्पोरेट ऋणकोचे नोंदणीकृत कार्यालय व प्रधान कार्यालयाचा (काही असल्यास) पत्ता | आर-२२३, एमआयडीसी कॉम्प्लेक्स, ठाणे, बेलापूर रोड, रबाळे, नवी मुंबई, महाराष्ट्र, भारत - ४००७०१. |
| ६. | कॉर्पोरेट ऋणकोच्या संदर्भात दिवाळखोरी सुरू होण्याची तारीख | २३.०६.२०२६ |
| ७. | दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया बंद होण्याची अंदाजित तारीख | १९.१२.२०२६ |
| ८. | अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून कार्यरत दिवाळखोर व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक | श्री. एस. गोपालक्रिष्णन IBBI/IPA-002/IP-N00151/2017-2018/10398 |
| ९. | बोर्डाकडे नोंदणीकृत अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ई-मेल | पत्ताः २०३, घाटकोपर नीलकंठ कोहीनो, जेठाभाई लेन, घाटकोपर (पूर्व)-४०००७७ ईमेल : gopi63.ip@gmail.com |
| १० | अंतरिम ठराव व्यावसायिकांशी पत्रव्यवहार करण्यासाठी पत्ता आणि ई-मेल वापरला जाईल | पत्ताः २०३, घाटकोपर नीलकंठ कोहीनो, जेठाभाई लेन, घाटकोपर (पूर्व)-४०००७७ ईमेल : supremeengineering.cirp@gmail.com |
| ११. | दावा सादर करण्याची अंतिम तारीख | ०८.०७.२०२६ |
| १२. | कलम २१ च्या उपकलम (६अ) च्या खंड (ब) अंतर्गत, जर असेल तर, अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे निश्चित केलेले धनकोंचे वर्ग | लागू नाही |
| १३. | वर्गातील कर्जदारांचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी ओळखल्या गेलेल्या दिवाळखोर व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गासाठी तीन नावे) | लागू नाही |
| १४. | (अ) संबंधित फॉर्म आणि (ब) अधिकृत प्रतिनिधींचे तपशील येथे उपलब्ध आहेतः | https://ibbi.gov.in/home/downloads लागू नाही |

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाने **मे. सुप्रीम इंजिनिअरिंग लिमिटेड**च्या कॉर्पोरेट दिवाळखोरी निराकरण प्रक्रियेला दिनांक २३.०६.२०२६ रोजी सुरू करण्याचा आदेश दिला आहे.
| 0448 | 1190 | 2269 | 3018 | 3681 | 4459 | 5452 | 6304 | 7286 | 8148 | 8990 | 9912 |
| 0461 | 1249 | 2272 | 3050 | 3685 | 4528 | 5526 | 6372 | 7463 | 8196 | 8996 | 9933 |
| 0523 | 1267 | 2287 | 3123 | 3731 | 4610 | 5574 | 6530 | 7525 | 8205 | 9104 | 9960 |
| 0530 | 1311 | 2297 | 3125 | 3743 | 4616 | 5605 | 6623 | 7527 | 8230 | 9118 | 9964 |
| 0581 | 1313 | 2329 | 3136 | 3764 | 4623 | 5663 | 6626 | 7542 | 8261 | 9148 | 9967 |
| 0607 | 1321 | 2340 | 3198 | 3939 | 4653 | 5680 | 6633 | 7567 | 8279 | 9158 | 9990 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचूक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## ई-लिलाव विक्री सूचना

(नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ अंतर्गत)

**व्हर्गो होम डिझायनर प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये)**

सीआयएन: U52609MH2010PTC241562

नोंद. कार्यालय: गोडाऊन क्र. १, इमारत क्र. १८३, जंबोशेड गोडाऊन, गाव गुंदवली, तालुका भिवंडी, ठाणे, मुंबई - ४२१३०२. संपर्क क्र.: ०२२ २०८२१२२०

माननीय एनसीएलटी, मुंबई खंडपीठ यांच्या आदेश दिनांक ३० ऑगस्ट, २०२१ नुसार व्हर्गो होम डिझायनर प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये) च्या खालील तक्त्यामध्ये उल्लेखित तपशिलानुसार ई-लिलावाद्वारे संपत्तीच्या विक्रीकरिता सर्वसाधारण जनतेस निम्नस्वाक्षरीकार यांच्यामार्फत याद्वारे सूचना देण्यात येत आहे. कॉर्पोरेट ऋणकोची संपत्ती **"जसे आहे जेथे आहे तत्त्वावर", "जसे आहे जे आहे तत्त्वावर", "तेथे जे आहे आणि कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर"** कोणत्याही प्रकारच्या प्रतिनिधित्व, हमी किंवा नुकसानभरपाईशिवाय विक्री करण्यात येईल. उपरोल्लेखित नुसार विक्री ऑनलाईन ई-लिलाव सेवा प्रदाता पीएसबी अलायन्सद्वारे पोर्टल https://ibbi.baanknet.com मार्फत **दि. १५ जुलै, २०२६ रोजी दु. १२.०० ते दु. ०२.०० दरम्यान** करण्यात येईल.

| मालमत्तेचा तपशील | राखीव किंमत (रु.मध्ये) | ईएमडी (रु.मध्ये) | विस्तारयोग्य मूल्य (रु.मध्ये) |
|---|---|---|---|
| कल्याणी नगर, पुणे येथील क्रिएटीसिटी मॉल मध्ये असलेली वस्तुसूची म्हणून धारण केलेल्या फर्निचर/होम डेकोर वस्तू आणि उपकरणे. | ६,०७,५०० | ६०,७५० | १०,००० |

| | |
|---|---|
| मालमत्तेच्या पाहणी/योग्य तपासणीचा अंतिम दिनांक | गुरूवार, दि. ०९ जुलै, २०२६, स. ११.०० ते सायं. ०५.०० |
| पात्रता दस्तऐवज बँकनेट पोर्टलवर सादर करण्याकरिता अंतिम दिनांक | शनिवार, दि. ११ जुलै, २०२६ |
| इरअ सादरीकरणाचा अंतिम दिनांक | सोमवार, दि. १३ जुलै, २०२६ |
| ई-लिलावाचा दिनांक आणि वेळ | बुधवार, दि. १५ जुलै, २०२६ रोजी दु. १२.०० ते ०२.०० पर्यंत |
| उच्चतम बोलीदाराची उद्‌घोषणा | बुधवार, दि. १५ जुलै, २०२६ |
| यशस्वी बोलीदाराची उद्‌घोषणा | बुधवार, दि. २२ जुलै, २०२६ |

ए. ईएमडी अनिवार्यरित्या बँकनेटद्वारे ई-वॉलेटचा वापर करून जमा करावी आणि परिसमापकास कोणतीही सूचना देण्याची आवश्यकता नाही.

बी. इच्छुक पात्र बोलीदारांनी ऑनलाईन ई-लिलावाच्या तपशिलवार अटी आणि शर्ती, पात्रता निकष, बोलीदारांद्वारे उद्‌घोषणा, ईएमडी आवश्यकता, इ. समाविष्ट असलेले संपूर्ण ई-लिलाव प्रक्रिया दस्तऐवज पहावे. दस्तऐवज https://ibbi.baanknet.com या वेबसाईटवर किंवा परिसमापकास vijayplulla@rediffmail.com वर ईमेल पाठवून उपलब्ध होईल.

सी. लिलावामध्ये सहभागी होण्यास इच्छुक बोलीदारांनी सर्व संबंधित दस्तऐवज ई-लिलाव पोर्टलवर अपलोड करणे आवश्यक आहे. बोलीदारांसह सर्व पत्रव्यवहार फक्त लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे करण्यात येईल.

डी. ई-लिलावाच्या कोणत्याही अटी आणि शर्ती स्वीकारण्याचे किंवा रद्द करण्याचे किंवा वाढविण्याचे किंवा सुधारण्याचे, इ. हक्क परिसमापकास आहेत (किंवा) परिसमापक ई-लिलाव कोणत्याही समयी रद्द करू शकतात. परिसमापक कोणतेही कारण न दर्शविता कोणत्याही समयी कोणत्याही बोली फेटाळण्याचे अधिकार राखून ठेवीत आहेत.

ई. संभाव्य बोलीदारांनी ते आयबीसी २०१ च्या कलम २९ए अंतर्गत, लागू असल्यानुसार, ते कोणत्याही अपात्रतेचा सामना करीत नाहीत याची पुष्टी करणारे हमीपत्र सादर करावयास हवे. जर बोलीदार कोणत्याही टप्प्यावर अपात्र आढळल्यास, ईएमडी जप्त करण्यात येईल.

एफ. ई-लिलाव प्रक्रिया, तपशील किंवा सहाय्याकरिता, बोलीदारांनी आयबीबीआय बँकनेट हेल्पडेस्क बॅक-एन्ड टीमला ईमेल: supportbaanknet@psballiance.com किंवा मोबाईल क्र. +९१ ८२९१२ २०२२० वर संपर्क करावा.

जी. या लिलाव सूचनेचा विस्तार/शुद्धीपत्रक https://ibbi.baanknet.com वेबसाईटवर सूचित करण्यात येईल आणि कोणतीही स्वतंत्र वृत्तपत्र प्रसिद्धी पारित करण्यात येणार नाही. इच्छुक बोलीदारांना विनंती आहे की त्यांनी कृपया https://ibbi.baanknet.com लिलाव वेबसाईटला भेट द्यावी.

ठिकाण: मुंबई
दिनांक: २५ जून, २०२६

विजय पी लुल्ला
परिसमापक - व्हर्गो होम डिझायनर प्रायव्हेट लिमिटेड
नोंद क्र.: IBBI/IPA-001/IP-P00323/2017-18/10593
एएफए: AA1/10593/02/300627/109089; वैधता दि. ३०.०६.२०२७ पर्यंत
पत्ता: २०३बी, आर्केडिया बिल्डींग, एनसीपीए मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०००२१.
ईमेल आयडी: Vijayplulla@rediffmail.com, संपर्क क्र.: ०२२ २०८२१२२०

## व्हर्गो मरीन शिपयार्ड प्रायव्हेट लिमिटेड

सीआयएन : U45400MH2010PTC207769

परिसमापकाचे कार्यालय: १७३, उद्योग भवन, सोनावाला रोड, गोरेगाव पूर्व, मुंबई - ४०००६३

**ई-लिलाव - आयबीसी, २०१६ अन्वये संपत्तीची विक्री**

**लिलावाचा दिनांक आणि वेळ: (दि. २७ जुलै, २०२६ सोमवार) स. ११.०० ते दु. १.०० पर्यंत (प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह)**

परिसमापन प्रक्रिया विनियमनाच्या विनियमन ३३ सह वाचावयाच्या आयबीसी, २०१६ च्या कलम ३५(एफ) अन्वये परिसमापन संपत्तीचा भाग बनलेल्या **व्हर्गो मरीन शिपयार्ड प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये)** च्या मालकीच्या संपत्तीची विक्री. ई-लिलाव **"जसे आहे जेथे आहे, जसे आहे जे आहे, तेथे जे आहे आणि कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर"** आयोजित करण्यात येईल. निम्नस्वाक्षरीकारांद्वारे विक्री ई-लिलाव सेवा पुरवठादारामार्फत बँकनेट लिलाव प्लॅटफॉर्म वेबसाईट https://ebkray.in द्वारे करण्यात येईल.

| ठिकाण | तपशील | परिमाण | राखीव किंमत | ईएमडी रक्कम | विस्तारयोग्य बोली रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| ०४था मजला, एफ विंग, इमारत क्र. २, कैलास इंडस्ट्रियल कॉम्प्लेक्स, वीर सावरकर मार्ग, हिरानंदानी पार्क साईटजवळ, विक्रोळी (पश्चिम) येथे स्थित जमीन | व्हर्गो मरीन शिपयार्ड प्रायव्हेट लिमिटेड या कंपनी अंतर्गत युनिट एफ ४०७ आणि एफ ४०८, जागेचे क्षेत्रफळ मोजमाप २१९ चौ.फू. कार्पेट | १ | ४८७८२२५ | ४८७८२३ | १,००,००० |

लिलाव करावयाच्या मालमत्तेचे तपशील, तिचे ठिकाण, लॉट तपशील, राखीव किंमत, ईएमडी आणि विस्तारयोग्य बोली रक्कम लिलाव वेबसाईटवर अपलोड केलेल्या प्रक्रिया, संस्थेचे शुल्क, दस्तऐवजामध्ये नमूद केल्यानुसार वाचावयाची आहे.

(जीएसटी अतिरिक्त भरावयाची आहे) संभाव्य बोलीदारांनी नादारी आणि दिवाळखोरी संकेताच्या कलम २९ए अन्वये पात्रता उद्‌घोषणा समाविष्ट असलेली आवश्यक कागदपत्रे इलेक्ट्रॉनिक लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे सादर करावयाची आहेत. संभाव्य बोलीदारांनी इसारा रक्कम अनामत (ईएमडी) बँकनेट लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे जमा करावी.

जर बोलीदार अपात्र आढळल्यास, ईएमडी जप्त करण्यात येईल. संभाव्य बोलीदाराने हमीपत्र सादर करावयाचे आहे की, ते संकेताच्या कलम २९ए अन्वये लागू मर्यादेपर्यंत कोणत्याही अपात्रतेचा सामना करीत नाहीत आणि कोणत्याही टप्प्यावर ते अपात्र आढळल्यास, जमा केलेली इसारा रक्कम जप्त करण्यात येईल.

| | |
|---|---|
| ईओआय सादरीकरणाचा अंतिम दिनांक | : दि. २४ जुलै, २०२६ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत |
| पाहणीचा अंतिम दिनांक | : दि. २४ जुलै, २०२६ - दु. १.०० वा.पर्यंत |
| ईएमडी सादरीकरणाचा अंतिम दिनांक | : दि. २४ जुलै, २०२६ - सायं. ५.०० वा. पर्यंत |
| ई-लिलावाचा दिनांक आणि वेळ | : दि. २७ जुलै, २०२६ - स. ११.०० ते दु. १.०० वा. |

**टीप : ऑनलाईन लिलाव विक्रीच्या तपशिलवार अटी आणि शर्ती, लागू कर, ई-लिलाव बोली दस्तऐवज, उद्‌घोषणा आणि इतर तपशील https://ebkray.in येथे दिलेल्या तपशिलासह वाचावयाच्या संबंधित प्रक्रिया ज्ञापन/दस्तऐवजामध्ये उपलब्ध आहेत.**

कोणत्याही स्पष्टीकरणाकरिता, कृपया निम्नस्वाक्षरीकार यांना virgocirp@gmail.com येथे संपर्क साधावा.

**सीए महेश सुरेका**
**व्हर्गो मरीन शिपयार्ड प्रायव्हेट लिमिटेडचे परिसमापक**
मोबाईल क्र. ९३२२५८१४१४/९८६७५९४०६७
IBBI/IPA-001/IP-P-00413/2017-2018/10736
एएफए वैधता - ३१.१२.२०२६

दिनांक: २५ जून, २०२६
ठिकाण: मुंबई

**FORM NO. 3** — **COURT ROOM NO. 81**

**IN THE BOMBAY CITY CIVIL COURT AT MAZGAON MUMBAI**
**Summary Suit No. 481 of 2025**
**(Under order V Rule-20 (1-A) of the CPC of 1908)**

Plaint lodged on : 02.01.2025 — Plaint admitted on : 15.07.2025

SUMMONS to answer plaint under Section O.XXXVII, rule-2 of the Code of Civil Procedure, 1908.

**Mr.Jagannath G. Adsule,** ... **Plaintiff**
Aged 61 years, Occu. Retired Indian, Inhabitant of Mumbai, r/at B.D.D.Chawl, Chawl No.40, Room no.35, Worli, Mumbai-400018. Mobile: 8652723694.

Versus

1. **Mr.Pandharinath K.Jadhav**
Aged-72 years, Occupation- Agent
R/at-Building no. no.18, Plot No.903. Shree Shashwat Tower, Pleasant park, Mira Bhayandar Road, Mira Road (East), District-Thane-401107. Mobile No.9221222199
2. **Aatharv4u Infra & Agro Ltd.** ....**Defendants**
Regn.No.U01403MH2011PLC221900, H.O.203-206, & 208, 2nd floor, Tanvi Diamoda, Novelty Silk Mill, near-Petrol pump) S.V.Road, Dahisar (East), Mumbai-400068.

(As per Order dated on 07.05.2025, presiding in Court Room No. 81.
**H.H.J.Shri Sangram S.Shinde)** **Exh-5**

GREETINGS the abovenamed Plaintiff have instituted a suit in this Hon'ble Court against you, the abovementioned Defendants under Rule 2 of Order XXXVII of the Code of Civil Procedure, 1908. viz.:-

The Plaintiff thereof prays that :-

a) That this Hon'ble Court may be pleased to pass an order and decree directing the Defendants to pay to the Plaintiff a sum of **Rs.2,76,000/-** (Rupees two Lakhs Seventy six thousand only) together with interest @ 24% per annum on the principal amount of **Rs.1,50,000/-** (Rupees One lakh Fifty thousand only) till the date of the filing of the present Summary suit and further on calculation of the same till making the payment to the Plaintiff and cost of the suit;

b) for such other and further reliefs/orders as this Hon'ble Court may deem fit and proper, in the circumstances of the matter;

You are hereby summoned **to cause an** appearance to be entered for you within 10 days from the service hereof in default whereof the plaintiff/s will be entitled at any time after the expiration of such 10 days to obtain a decree for the sum of **Rs.2,76,000/-** (Rupees Two lakhs seventy six thousand only), and such sum as prayed for and for costs, together with such interest, if any, as the Hon'ble court may order.

If you cause an appearance to be entered for you the plaintiffs will thereafter serve upon you a writ of summons at the hearing of which you will be entitled to ask for the Hon'ble court for leave to defend the suit.

Leave to defend may be obtained if you satisfy the Hon'ble court by affidavit or otherwise that there is a defence to the suit on the merits or that it is reasonable that you should be allowed to defend the suit.

Given under my hand and the seal of this Hon'ble Court.

**Dated this 15th day of June, 2026.**

Seal

**Sd/-**
**For Registrar**
**City Civil Court,**
Bombay, Mazgaon,

**Sd/-**
**Mr. Ajaykumar Yeshwant G.Bhosle**
Advocate for the Plaintiff Office: 92/21, B.D.D.Chawl, near-Sane Guruji Maidan, Worli, Mumbai -400018. Mobile:9820374297/8097334865
Email:aybhosleassociates@gmail.com

You are hereby informed that the Free Legal Service from the State Services Authority, High Court Legal Services Committee, District Service Authority and Taluka Legal Services Committee as per eligibility criteria are available to you and in case you are eligible and desire to avail the free legal services, you may contact any of the above Legal Services Authority/ Committee.

**Sd/- Advocate for Plaintiff/ Signature**

**Note:** Next date in this Suit is **22/07/2026**. Please check the status and next/further date of this Suit on the official website of City Civil & Sessions Court, Greater Bombay.

# लोकलमध्ये तरुणाची चाकूने हत्या

पान १ वरून - मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली. आरोपीला पकडण्यासाठी पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. फुटेजमध्ये काळा शर्ट व काळी पॅन्ट परिधान केलेला आणि हातात चाकू असलेला आरोपी स्पष्ट दिसून आला. त्यानंतर पोलिसांनी आरोपी सुवर्णाला कुर्ला येथून अटक केली. आरोपी सुवर्णा हा विमानतळावरील पॅकेजिंग विभागात काम करतो. या घटनेबाबत प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, इतर प्रवाशांनी आरोपीला थांबवण्याचा प्रयत्न करत मयंकला दुसऱ्या दरवाज्याजवळ हलवले. मात्र आरोपी आक्रमकच राहिला. गोरेगाव आणि मालाड स्थानकांदरम्यान त्याने आपल्या बॅगेची झिप उघडून चाकू बाहेर काढला आणि मयंकच्या पोट व छातीवर तीन ते चार वार केले. मालाड येथे जानेवारी २०२६ मध्ये लोकलच्या दरवाज्यात उभे राहण्यावरून झालेल्या वादानंतर एका प्राध्यापकाची चाकूने भोसकून हत्या करण्यात आली होती.

## E-TENDER NOTICE

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

E-Tenders are invited from experienced Licensed Electrical contractors for the work as detailed below.

| Tender No. | SE/KC-II/Tech/CMRI/KLN-R/2026-27/ T-02 | Sale of Tender Date 23.06.2026 | Date of Pre bid meeting at 11.00 hrs. on 25.06.2026 |
|---|---|---|---|
| Estimated Amount | **Rs. 29.00 Lakhs** | | |
| Tender form fee | Rs. 5900/- (Including 18% GST) | Last Date of Submission of e-tender 30.06.2026 up to 15.00 hrs. | |
| Name of work | **Annual contract for monthly meter reading of LT Consumers having load above 20 KW & some LT consumers having load below 20KW with AMR/MRI compatible meters (having TOD tariff) through CMRI (Except Smart Meters) under Kalyan R Division** | | |
| EMD Amount | Rs. 29,000/- (Rs. Twenty Nine Thousand only) | | |

**The bidders are requested to get registered for e-tendering procedure.**
**Contact Person – Executive Engineer (Admin.)**
**MSEDCL, Kalyan –II circle (O&M), Tejashree, Third floor, Kalyan (W) - 421 301**
**Email – sekalyan2@gmail.com**
**Mobile No. 8873626969 Website-www.MSEDCL e-tendering**

**Sd/-**
**Executive Engineer (Admin), Kalyan Circle II**

## भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका
भिवंडी (ठाणे)

**ई-निविदा सूचना क्र. ०८ सन २०२६-२०२७ (पहिल्यांदा प्रसिद्धी)**

**खालील काम करण्याकरिता सक्षम व अनुभवी ठेकेदारांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहे.**

| अ. क्र. | कामाचे स्वरूप | अंदाजित खर्च | निविदा फॉर्म फी | निविदा विक्री व स्विकारण्याची अंतिम दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | सन २०२६-२०२७ भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या पाईप लाईन निगा व दुरुस्ती कामाकरिता साहित्य पुरविणेबाबत | रु. ८६,८८,९४५/- | रु. २३६०/- | दि. २४/०६/२०२६ ते दि. ०१/०७/२०२६ |
| | सन २०२६-२७ भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या बोअरवेल निगा व दुरुस्ती कामाकरिता साहित्य पुरविणेबाबत. | रु. ५५,८०,५४६/- | रु. २३६०/- | |
| | सदर निविदा बाबतची माहिती मनपा संकेतस्थळावर mahatenders.gov.in वर दिनांक २४/०६/२०२६ पासून उपलब्ध आहे. | | | |

सही/-
**कार्यकारी अभियंता (प्र.)**
**पाणी पुरवठा विभाग**

जा.क्र./ज.सं.वि./६९७ दि. २४/०६/२०२६ — **भिवंडी. नि.शहर महानगरपालिका, भिवंडी.**

## महाराष्ट्र शासन राजपत्र
### असाधारण भाग एक - कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १२, अंक ४३) — बुधवार, जून १०, २०२६/ ज्येष्ठ २०, शके १९४८ — (पृष्ठे ४, किंमत: रुपये ११.००

**असाधारण क्रमांक ६५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**उपविभागीय अधिकारी, तथा उपविभागीय दंडाधिकारी ठाणे उपविभाग, ठाणे यांजकडून.**

**अधिसूचना**

**महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१.**

क्रमांक टिडी/भूसं/एमआयडीसी/बोरीवली/एसआर / ८५/२०२६. - उद्योग, ऊर्जा, कामगार, व खनिकर्म विभागाकडील अधिसूचना क्र. आयडीसी २०२६/(प्र.क्र.११७)/उद्योग-१४, दिनांक ०९ एप्रिल, २०२६ अन्वये उक्त अधिनियमाच्या विनिर्दिष्ट करण्यात आले त्या क्षेत्रास दिनांक ९/०४/२०२६ अंमलात येईल असा महाराष्ट्र शासनाने औद्योगिक क्षेत्र जाहीर केले आहे.

आणि ज्याअर्थी, यासोबतच्या अनुसूचीत नमूद केलेल्या जमिनी, उक्त प्रकरण सहाचे उपबंध उपरोक्त प्रमाणे अंमलात आले आहेत अशा क्षेत्रात आहेत.

आणि, ज्याअर्थी, उपरोक्त अधिनियमाचे प्रकरण सहा हे ज्या क्षेत्रांना लागू करण्यात आले आहे अशा क्षेत्रांना असणाऱ्या आणि महाराष्ट्र विकास महामंडळामार्फत (यात यानंतर ज्याचा ''उक्त महामंडळ'' असा निर्देश करण्यात आला आहे) विकास करण्याच्या प्रयोजनार्थ किंवा उक्त अधिनियमाच्या उद्दिष्टांच्या पुष्ठ्यर्थ असेल अशा इतर कोणत्याही प्रयोजनार्थ, आवश्यक असणाऱ्या जमिनी संपादन करण्याची शक्ती, उक्त अधिनियमाच्या कलम ३२ अन्वये राज्य शासनास प्रदान करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २, खंड (क) अन्वये राज्य शासनाने जी कामे जिल्हाधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आली आहेत. उक्त अधिनियमाच्या कलम ३२ (२), ३३(२), ३३ (३), ३६ व ३८ अन्वये कामे पार पाडण्यासाठी शासन निर्णय क्र.आयडीसी २०२६/(प्र.क्र.११७)/ उद्योग-१४ दि. १५ एप्रिल, २०२६ अन्वये उपविभागीय अधिकारी, ठाणे यांची भूसंपादन अधिकारी म्हणून विशेषरित्या नेमणूक केली आहे.

आणि ज्याअर्थी, औद्योगिक क्षेत्र / औद्योगिक वसाहत म्हणून विकसित करण्यासाठी किंवा दोन्ही करिता सोबतच्या अनुसूचित वर्णन केलेल्या जमिनी महामंडळास आवश्यक आहेत असे उपविभागीय अधिकारी, ठाणे यांचे मत झाले आहे.

ज्याअर्थी, आता उक्त अधिनियमाचे कलम ३२, पोट-कलम (२) अन्वये उपरोक्तप्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या राज्य शासनाच्या शक्तीचा वापर करून याद्वारे उपविभागीय अधिकारी, ठाणे यासोबतच्या अनुसूचित उल्लेख केलेल्या जमिनीमध्ये हितसंबंध आणि अधिकार असणाऱ्या सर्व व्यक्तींना यासोबतच्या अनुसूचित उल्लेख केलेल्या जमिनी उक्त प्रयोजनार्थ का संपादन करण्यात येऊ नयेत यासंबंधी पंधरा दिवसांमध्ये खाली सही करणारास, लेखी स्वरूपात कारण दाखविण्या बद्दल फर्माविणारी नोटीस देत आहे.

या नोटिशीच्या तारखेनंतर, जिल्हाधिकाऱ्यांच्या मंजुरीशिवाय विक्री करून, पट्ट्याने देऊन, गहाण ठेवून, अभिहस्तांकन करून, अदलाबदल करून किंवा अन्यरितीने, करावयाच्या उक्त जमिनीच्या विल्हेवाटी संबंधी केलेला कोणताही करार, किंवा तीवर कोणताही खर्च किंवा तीमध्ये केलेल्या सुधारणा या उक्त जमिनीच्या अंतिमतः संपादन करण्यात येतील अशा भागासंबंधी भरपाई निर्धारित करणाऱ्या अधिकाऱ्याकडून उक्त अधिनियमाचे कलम ३३, पोट-कलम (५) व भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापित करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ कलम २६ व ३० नुसार विचारात घेतल्या जाणार नाहीत.

जिची व्यक्तिगत सुनावणी करण्याची इच्छा असेल अशा कोणत्याही व्यक्तीस, या नोटिशीच्या तारखेपासून पंधरा दिवसांमध्ये भेटीची वेळ ठरवून कोणत्याही कामाच्या दिवशी, सकाळी ११.०० ते सायं. ५.०० वाजेपर्यंत खाली सही करणार यांच्या समक्ष जातीने किंवा आपल्या कायदेशीर कुलमुखत्यारामार्फत हजर राहता येईल.

**अनुसूची**

**गाव - बोरीवली** — **तालुका - ठाणे** — **जिल्हा - ठाणे**

| अ. क्र. (१) | सर्व्हे नंबर (२) | हिस्सा नंबर (३) | क्षेत्र - हे. आर (४) |
|---|---|---|---|
| १ | ३४ | ० | ०.१७४० |
| २ | ३५ | ० | ०.२८३० |
| ३ | ३६ | ० | ०.१४२० |
| ४ | ३७ | ० | ०.२०७० |
| ५ | ३८ | ० | ०.४७५० |
| ६ | ३९ | ० | ०.२२८० |
| ७ | ४० | ० | ०.१४४० |
| ८ | ४१ | ० | ०.४७०० |
| ९ | ४२ | १ | १.१६८० |
| १० | ४२ | २ | ०.००८० |
| ११ | ४२ | ३ | ०.०१३० |
| १२ | ४३ | ० | ०.१८२० |
| १३ | ८६ | ३ | ०.३९०० |
| १४ | ८७ | ० | ४.९२०० |
| १५ | ८७ | २ब | ०.८९०० |
| १६ | ८७ | २अ | ०.९१०० |
| १७ | ८८ | ० | ३.४२०० |
| १८ | ८९ | १ | २.३८०० |
| १९ | ८९ | २ | ३.४००० |
| २० | ८९ | ४ | ०.१९०० |
| | **एकूण क्षेत्र** | | **१९.९९४** |

सही/-
**उर्मिला पाटील,**
उपविभागीय अधिकारी,
ठाणे उपविभाग, ठाणे.

ठाणे,
दिनांक ९ जून २०२६.

**BY THE SUB DIVISIONAL OFFICER AND SUB DIVISIONAL MAGISTRATE THANE DIVISION, THANE.**

NOTIFICATION

**MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT ACT, 1961.**

No. TD/LA/MIDC/ BORIVALI/SR/85/2026. Whereas, as per Government Resolution No. IDC 2026/(C.R.117)/Ind-14 dated 09/04/2026 issued by the Industries, Energy, Labour and Mining Department, Government of Maharashtra, the area specified therein has been declared as an Industrial Area with effect from 09/04/2026;

And whereas, the lands specified in the Schedule appended hereto are situated within the area to which the provisions of Chapter VI of the said Act have been made applicable as aforesaid;

And whereas, under Section 32 of the said Act, the State Government is empowered to acquire land required for the purpose of development by the Maharashtra Industrial Development Corporation (hereinafter referred to as "the said Corporation") or for any other purpose in furtherance of the objectives of the said Act in such areas to which Chapter VI has been applied;

And whereas, under Section 2, clause (c) of the said Act, the State Government has entrusted certain functions to the District Collector, and for the purpose of carrying out the functions under Sections 32(2), 33(2), 33(3), 36 and 38 of the said Act, the Sub-Divisional Officer, Thane has been specially appointed as the Land Acquisition Officer vide Government Resolution No. IDC 2026/ (C.R.117)/Ind-14 dated 15th April, 2026;

And whereas, the Sub-Divisional Officer, Thane is satisfied that the lands described in the Schedule appended hereto are required by the said Corporation for the purpose of development as an Industrial Area/Industrial Estate or for both;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (2) of Section 32 of the said Act, the Sub-Divisional Officer, Thane hereby issues this Notice calling upon all persons having any interest in, or rights over, the lands specified in the Schedule appended hereto to show cause in writing to the undersigned on or before 15 Days as to why the said lands should not be acquired for the aforesaid purpose;

And further, any sale, lease, mortgage, transfer, exchange or any other mode of disposal of the said lands effected after the date of this Notice, without the approval of the District Collector, and any expenditure incurred thereon or improvements made therein, shall not be taken into consideration by the authority determining compensation in respect of the land finally acquired, in accordance with sub-section (5) of Section 33 of the said Act and Sections 26 and 30 of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013;

Any person desirous of being heard in person may appear before the undersigned either in person or through a duly authorized legal representative, by prior appointment, within **15 Days** from the date of this Notice, on any working day between 11:00 A.M. and 5:00 P.M.

Schedule

VILLAGE - BORIVALI — TALUKA - THANE — DISTRICT - THANE

| Sr. No. (1) | Survey No. (2) | Hissa No. (3) | Area (H.R.) (4) |
|---|---|---|---|
| 1 | 34 | 0 | 0.1740 |
| 2 | 35 | 0 | 0.2830 |
| 3 | 36 | 0 | 0.1420 |
| 4 | 37 | 0 | 0.2070 |
| 5 | 38 | 0 | 0.4750 |
| 6 | 39 | 0 | 0.2280 |
| 7 | 40 | 0 | 0.1440 |
| 8 | 41 | 0 | 0.4700 |
| 9 | 42 | 1 | 1.1680 |
| 10 | 42 | 2 | 0.0080 |
| 11 | 42 | 3 | 0.0130 |
| 12 | 43 | 0 | 0.1820 |
| 13 | 86 | 3 | 0.3900 |
| 14 | 87 | 0 | 4.9200 |
| 15 | 87 | 2B | 0.8900 |
| 16 | 87 | 2A | 0.9100 |
| 17 | 88 | 0 | 3.4200 |
| 18 | 89 | 1 | 2.3800 |
| 19 | 89 | 2 | 3.4000 |
| 20 | 89 | 4 | 0.1900 |
| **TOTAL AREA** | | | **19.994** |

sd/-
URMILA PATIL,
Sub Divisional Officer,
Thane Sub Division, Thane.

Thane,
Dated 9th June 2026.

क्र.टिडी/टे-५/भूसं/एसआर-८५/बोरीवली/कलम-३२(२)/२०२६

नवा काळ
• मुंबई | गुरुवार २५ जून, २०२६ • पान -८



# खामेनी यांच्या अंत्यसंस्कारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींना निमंत्रण

**तेहरान -** इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना इराणचे माजी सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या अंत्यसंस्काराला उपस्थित राहण्याचे निमंत्रण दिल्याचे वृत्त स्थानिक माध्यमांनी दिले आहे. खामेनी यांच्या अंत्यसंस्काराची प्रक्रिया ४ जुलैपासून सुरू होणार असून, ९ जुलै रोजी त्यांच्या जन्मगावी असलेल्या ईशान्य इराणमधील पवित्र शहर मशहद येथे दफनविधीने तिची सांगता होणार आहे. अंत्यसंस्कारादरम्यान तेहरान आणि पवित्र शहर कुम येथेही विविध श्रद्धांजली कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.




**रोजप्रमाणेच सकाळ उजाडली होती. आज मला थोडी उशिराच जाग आली. मी निवांत चहाचा कप हातात घेतला आणि किचनमधून हॉलकडे आले. आई नेहमीप्रमाणे स्वयंपाकघरात सकाळच्या कामात गुंतली होती. बाबांचं आज ऑफिस उशिरा असल्यामुळे घरात एक वेगळाच निवांतपणा होता. मोबाईलवर मंद आवाजात भजन सुरू होतं आणि खिडकीतून येणाऱ्या कोवळ्या उन्हाने संपूर्ण हॉल उजळून निघाला होता.**

**तेवढ्यात** आजोबांचा हलकासा हसण्याचा आवाज कानावर पडला.

मी सहज नजरेने समोर पाहिलं...

माझे बाबा खुर्चीवर बसलेल्या आजोबांचे केस अगदी हळूवारपणे विंचरून देत होते.

बाबा, जरा स्थिर बसा ना... नाहीतर कंगवा अडकेल. आजोबा लहान मुलासारखे हसले.

अरे, आता या वयात माझे केस तरी कुठे उरलेत रे?

बाबांनीही हसत उत्तर दिलं,

केस कमी झाले म्हणून काय झालं? आमच्या डोक्यावरचं छत्र अजूनही तुम्हीच आहात.

मी चहाचा कप हातातच धरून तिथेच थबकले. त्या सकाळी मला घरात भजनाचा आवाज ऐकू येत होता, पण समोर दिसत होतं ते त्याहूनही मोठं स्तोत्र होतं-एका मुलाने आपल्या वृद्ध वडिलांवर केलेल्या निःशब्द प्रेमाचं.

थोड्याच वेळात बाबांनी आजोबांच्या हातावर औषध ठेवलं, पाण्याचा ग्लास पुढे केला आणि त्यांच्या आवडीचं भजन मोबाईलवर लावून दिलं.

आज बरं वाटतंय ना, बाबा?

आजोबांनी फक्त मान हलवली.

त्यांच्या चेहऱ्यावर एक समाधान होतं.

दुपारी डॉक्टरांकडे जायचं होतं. संध्याकाळी त्यांना आवडणारं धार्मिक पुस्तक आणायचं होतं. रात्री जेवणात मऊ आमटी आणि गरम भात करायचा होता.

हे सगळं बाबा इतक्या सहज करत होते, जणू ती जबाबदारी नव्हतीच... ती त्यांच्या प्रेमाची रोजची सवय होती.

मी आईला हळूच विचारलं,

आई, बाबा आजोबांची एवढी मनापासून काळजी कशी घेतात गं? आई पोळी लाटत लाटत शांतपणे म्हणाली, बाळा, ज्यांनी आयुष्यभर आपल्याला बोट धरून चालायला शिकवलं, त्यांचा हात उतारवयात सोडायचा नसतो.

त्या एका वाक्याने माझ्या मनात अनेक चित्रं तरळली.

लहानपणी आजोबांनी बाबांना शाळेत सोडलं असेल...

सायकल शिकवली असेल...

पहिल्या पगारावर अभिमानाने त्यांच्या पाठीवर थाप मारली असेल...

आणि आज...

आज काळाने फक्त भूमिका बदलल्या होत्या.

आज बाबा त्यांच्या स्वतःच्या बाबांचे आधार झाले होते. आजोबांना औषधाची वेळ आठवत नव्हती, पण बाबांना प्रत्येक गोळीची वेळ पाठ होती. आजोबांना मोबाईल वापरता येत नव्हता, पण बाबा त्यांच्या आवडीची भजनं, प्रवचनं आणि जुन्या गाण्यांची यादी तयार करून ठेवत होते. आजोबांना चालताना आधाराची गरज होती, आणि बाबा सावलीसारखे त्यांच्या प्रत्येक पावलासोबत चालत होते.

त्या क्षणी माझ्या मनात एक विचार अलगद उमलला...

आयुष्यातील सर्वात मोठा वारसा पैसा, जमीन किंवा दागिने नसतात; आपल्या वडिलांचा हात कधीच सुटू न देण्याची सवय हा सर्वात मोठा वारसा असतो. मुलांसाठी वडील आणि वडिलांसाठी सावली होऊन जो जगतो, त्याच्या रूपानेच देव प्रत्येक घरात रोज वावरत असतो. त्या रात्री सहज मोबाईल हातात घेतला.

सोशल मीडियावर फादर्स डेच्या शुभेच्छांचा पाऊस पडत होता.

कोणी केक कापत होतं...

कोणी फोटो टाकत होतं...

कोणी महागड्या भेटवस्तू देत होतं...

मी मोबाईल शांतपणे बाजूला ठेवला.

समोर बाबा आजोबांना प्रेमाने चादर पांघरून देत होते.

उशी नीट करत होते.

दिवा बंद करण्याआधी त्यांनी हळूच विचारलं,

बाबा, अजून काही हवंय का?

आजोबा हसले.

नाही रे... तू आहेस ना, मग अजून काय हवं? त्या चार शब्दांनी माझ्या मनात 'फादर्स डे'चा अर्थ कायमचा बदलून गेला.

त्या दिवशी मला समजलं...

एक पिता होणं म्हणजे फक्त मुलांना जन्म देणं नाही. आपल्या वृद्ध होत चाललेल्या वडिलांचे पुन्हा वडील होणं, त्यांच्या हट्टांना समजून घेणं, औषधांची वेळ लक्षात ठेवणं,



त्यांच्या एकटेपणात त्यांच्यासोबत शांत बसणं, त्यांच्या चालण्याचा आधार होणं आणि त्यांना कधीच ओझं वाटू न देणं... हेच पितृत्वाचं सर्वोच्च रूप आहे.

त्या रात्री मी स्वतःशी एक छोटासा निश्चय केला. उद्या मी कोणाचा बाबा होईन की नाही, हे काळ ठरवेल.

पण माझे बाबा जेव्हा थकतील, तेव्हा त्यांच्या आयुष्यात मी नक्कीच त्यांचा आधार बनेन. कारण वडिलांना दिलेला गुलाबाचा गुच्छ एक दिवस कोमेजतो...

महागडी भेटवस्तूही विसरली जाते...

पण उतारवयात त्यांच्या हातात दिलेला आपला हात आणि त्यांच्या डोळ्यांत दिलेला विश्वास आयुष्यभर ताजा राहतो. मुलांसाठी बाबा होणं ही जबाबदारी आहे; पण आपल्या वडिलांसाठी पुन्हा बाबा होणं हा संस्कार आहे.

आणि जो माणूस एका हाताने आपल्या मुलांचं भविष्य घडवतो आणि दुसऱ्या हाताने आपल्या वृद्ध वडिलांना आधार देतो...

त्याच्यासाठी फादर्स डे कॅलेंडरवरच्या एका तारखेचं नाव नसतं. त्याच्या आयुष्यातला प्रत्येक दिवसच खरा फादर्स डे असतो.

सौ. तृप्ती देव
भिलाई, छत्तीसगड

# लग्नपत्रिकेवर आता नवरा-नवरीच्या नावापुढे जन्मतारीख लिहावी लागणार

■ मुंबई

**राज्यातील** बालविवाह रोखण्यासाठी लग्नपत्रिकेवर वधू-वरांची जन्मतारीख नमूद करणे बंधनकारक करण्याचा विचार सुरू असून, याबाबत लवकरच निर्णय घेतला जाणार असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी विधानसभेत दिली.

राजस्थान सरकारने लग्नपत्रिकेत वधू-वरांची जन्मतारीख नमूद करण्याचा निर्णय घेतल्यानंतर महाराष्ट्र सरकारनेही त्याच धर्तीवर नियम लागू करण्यासाठी हालचाल सुरू केली आहे. यासंदर्भात महाराष्ट्र राज्य बाल हक्क



संरक्षण आयोगाने राजस्थान सरकारकडे कार्यपद्धती आणि मार्गदर्शक सूचनांचा अहवाल मागविला आहे. विधान परिषदेत बालविवाहाच्या वाढत्या संख्येबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला. परभणी जिल्ह्यात तब्बल ४८ टक्के मुलींचे अल्पवयात विवाह

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

झाल्याची धक्कादायक बाब समोर आली. राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये बालविवाहाचे प्रमाण अजूनही चिंताजनक असल्याचे सदस्यांनी निदर्शनास आणून दिले.

# उपसभापती पदासाठी पुढील आठवड्यात निवडणूक! गोऱ्हेंच्या नावाची चर्चा

■ मुंबई

**विधान** परिषदेच्या उपसभापती पदासाठीची निवडणूक पुढील आठवड्यात होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. महायुतीतील सत्तासमीकरणांचा विचार करता हे पद मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेच्या वाट्याला जाण्याची दाट शक्यता आहे.

महायुतीत विधानसभा अध्यक्षपद भाजपाकडे, विधानसभा उपाध्यक्षपद राष्ट्रवादी काँग्रेसकडे, तर विधान परिषदेचे सभापतीपदही भाजपाकडे आहे. त्यामुळे समतोल राखण्यासाठी विधान परिषदेचे उपसभापतीपद शिवसेनेला दिले जाऊ शकते, अशी राजकीय वर्तुळात चर्चा आहे. या पदासाठी शिवसेना नेत्या नीलम गोऱ्हे यांचे नाव सर्वाधिक चर्चेत आहे. विधान परिषद उपसभापती म्हणून त्यांनी यापूर्वीही कामकाज सांभाळले असून, संसदीय कामकाजाचा त्यांना मोठा अनुभव आहे.

# खरगे पिता-पुत्रांनी १०० कोटींची जमीन लाटली! भाजपाचा आरोप

■ नवी दिल्ली

**काँग्रेसचे** राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि त्यांचे पुत्र कर्नाटक सरकारमधील मंत्री प्रियांक खरगे यांच्यावर भाजपाने १०० कोटींच्या जमीन घोटाळ्याचा आरोप केला आहे.

भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते प्रदीप भंडारी यांनी दिल्लीत पत्रकार परिषद घेऊन दावा केला की, मल्लिकार्जुन खरगे, प्रियांक खरगे आणि त्यांच्या कुटुंबियांचा सहभाग असलेल्या सिद्धार्थ विहार ट्रस्टच्या माध्यमातून कर्नाटकमध्ये जमिनी हडपण्यात आल्या. २०२४ मध्ये कर्नाटक सरकारच्या औद्योगिक विकास मंडळाने ट्रस्टला पाच एकर जमीन दिली. ही जमीन मूलतः हवाई आणि संरक्षण क्षेत्रातील संशोधन व विकास संस्थेसाठी राखीव होती. ती सिद्धार्थ विहार ट्रस्टला देण्यात आली. या पाच एकर जमिनीची सध्याची बाजारातील किंमत सुमारे १०० कोटी रुपये आहे. या जमिनीवर आता संशोधन किंवा विकासाशी संबंधित कोणतेही काम सुरू नाही. सिद्धार्थ विहार ट्रस्टविरोधात भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे असल्याचा दावा करत भंडारी यांनी या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली.

# घुलेवर अखेर रात्री अंत्यसंस्कार रमेश घुलेचा जबाब नोंदवला

■ बीड

**केज** तालुक्यातील विलास घुले हत्या प्रकरणात सलग तीन दिवस सुरू असलेले आंदोलन अखेर काल रात्री स्थगित करण्यात आले. खासदार बजरंग सोनवणे यांचे पुत्र सौरव सोनवणे यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी नातेवाईकांनी केली आहे. दरम्यान, मृताचा भाऊ रमेश घुले यांचा पुरवणी जबाब पोलिसांनी नोंदवून घेत सखोल चौकशीचे आश्वासन दिल्यानंतर तब्बल ५३ तासांनंतर विलास घुले यांच्या पार्थिवावर टाकळी शिवारात अंत्यसंस्कार झाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही मध्यरात्री आंदोलकांशी संपर्क साधून प्रकरणाची माहिती घेतली आहे.



या प्रकरणी शासन निर्देशानुसार आयपीएस व्यंकटराम यांच्या अध्यक्षतेत एसआयटी स्थापन केली आहे.

विलास घुले हत्या प्रकरणातील आरोपींना अटक करावी आणि शरद पवार गटाचे खासदार बजरंग सोनवणे यांचे पुत्र सौरव सोनवणे यांच्यावर गुन्हा दाखल करावा, या मागणीसाठी नातेवाईक आणि ग्रामस्थांनी काल आंदोलन केले होते. त्यांनी घुले यांचा मृतदेह नऊ तास केज पोलीस ठाण्यासमोर ठेवला होता. यामुळे केज शहरात सलग तिसऱ्या दिवशी बंद पाळण्यात आला, तर अंबाजोगाई-केज-मांजरसुंबा महामार्गावर रास्ता रोकोमुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली.

# मुंद्रा बंदर ड्रग तस्करी प्रकरण उद्योगपती तलवारवर ईडीचे छापे

■ नवी दिल्ली

**गुजरातमधील** मुंद्रा बंदरावर २०२१ मध्ये जप्त करण्यात आलेल्या सुमारे २,९८८ किलो अफगाण हेरॉईन तस्करी प्रकरणात ईडीने आज दिल्लीतील अनेक ठिकाणी छापेमारी केली. ही कारवाई उद्योगपती हरपीत सिंग तलवार उर्फ कबीर तलवार आणि त्याच्या सहकाऱ्यांशी संबंधित ठिकाणांवर करण्यात आली.

सप्टेंबर २०२१ मध्ये महसूल गुप्तचर संचालनालयाने मुंद्रा बंदरावर सुमारे २१ हजार कोटी रुपये किमतीचे जवळपास ३,००० किलो अफगाण हेरॉईन जप्त केले होते. समुद्री मार्गाने भारतात आलेल्या अमली पदार्थांच्या सर्वात मोठ्या खेपांपैकी ही एक मानली जाते. या प्रकरणात २०२१ पासून मनी लाँड्रिंग प्रतिबंधक कायद्यांतर्गत तपास सुरू असला तरी काही नव्या माहितीच्या आधारे ईडीने ताजी छापेमारी मोहीम हाती घेतली आहे. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, दिल्लीतील कबीर तलवार, शमशुद्दीन आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या एकूण पाच ठिकाणांची झडती घेण्यात आली.

कबीर तलवारला ऑगस्ट २०२२ मध्ये एनआयएने अटक केली होती. पाकिस्तानच्या पाठबळ असलेल्या कटाचा भाग म्हणून भारतात उच्च प्रतीचे अमली पदार्थ तस्करीद्वारे आणल्याचा आरोप त्याच्यावर ठेवण्यात आला होता.

# रेशन वाटपाचा नियम बदलणार लाभार्थ्यांच्या संख्येनुसार धान्य

■ नवी दिल्ली

**देशाच्या** सार्वजनिक वितरण प्रणाली व शिधावाटप प्रणालीमध्ये मोठे बदल होण्याची शक्यता आहे. केंद्र सरकारने राष्ट्रीय अन्न सुरक्षा (सुधारणा) विधेयक, २०२६ चा मसुदा प्रसिद्ध केला आहे. यामध्ये अंत्योदय अन्न योजनेअंतर्गत शिधावाटपाच्या पद्धतीत बदल प्रस्तावित आहेत. मसुद्यानुसार, सध्या अंत्योदय अन्न योजनेअंतर्गत प्रत्येक पात्र कुटुंबाला दरमहा ३५ किलोग्रॅम धान्य मिळते. आता, हे बदलून दरमहा प्रति व्यक्ती ७ किलोग्रॅम धान्य देण्याचा प्रस्ताव आहे.

सरकारच्या मते, या बदलाचा उद्देश अन्न व पोषण सुरक्षा मजबूत करणे आणि वितरण प्रणाली अधिक न्याय्य बनवणे हा आहे. मात्र, सरकारने स्पष्ट केले आहे की प्रति कुटुंब धान्याची कमाल मर्यादा दरमहा ३५ किलोग्रॅमच राहील. याचा अर्थ असा की, कुटुंबातील सदस्यांच्या संख्येनुसार धान्याचे वितरण केले जाईल. परंतु एकूण प्रमाण निर्धारित मर्यादेपेक्षा जास्त होणार नाही. सरकारचा विश्वास आहे की सध्याची प्रणाली कुटुंबाच्या आकारावर आधारित असमानता निर्माण करते.

# म्हाडा रहिवाशांना भाडे वाढवून द्या! आदित्य ठाकरेंची मागणी

■ मुंबई

**मुंबईतील** म्हाडाच्या रहिवाशांना भाडे वाढवून द्यावे, अशी मागणी उबाठा आमदार आदित्य ठाकरे यांनी विधानसभेत औचित्याच्या मुद्द्यातून केली.

आदित्य ठाकरे म्हणाले की, मुंबईमध्ये म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने यावर्षी जवळपास ८२ उपकरप्राप्त इमारती अतिधोकादायक घोषित केल्या आहेत. त्या ठिकाणच्या रहिवाशांना वारंवार नोटिसा पाठवून त्यांना बाहेर काढण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यामुळे माझी विनंती आहे की, सध्या देण्यात येणारे २० हजार रुपये भाडे वाढवून ४० हजार रुपये करण्यात यावे. तसेच, रहिवासी ज्या परिसरात राहतात त्याच ठिकाणी संक्रमण शिबिरांची व्यवस्था करण्यात यावी. त्या ठिकाणी राहणाऱ्या सर्व रहिवाशांची अधिकृत नोंदणी करून त्यांना भाडेकरू (टेनंट) म्हणून ओळख देण्यात यावी आणि त्यानंतरच त्यांना स्थलांतरित करण्यात यावे.



# कोकणात अणुऊर्जा प्रकल्प मुणगे ग्रामस्थांचा विरोध

■ देवगड

**सिंधुदुर्ग** जिल्ह्यातील देवगड तालुक्यात प्रस्तावित अणुऊर्जा प्रकल्पाविरोधात स्थानिक ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. मुणगे गावात आयोजित ग्रामसभेत ग्रामस्थांनी एकमताने या प्रकल्पाला विरोध दर्शवत तीव्र आंदोलनाचा इशारा दिला. तसेच प्रकल्पविरोधी ठरावही ग्रामसभेत मंजूर करण्यात आला.

मुणगे परिसरात ४,००० ते ७,२०० मेगावॅट क्षमतेचा एनटीपीसीचा अणुऊर्जा प्रकल्प प्रस्तावित असल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली. या प्रकल्पासाठी सुमारे एक लाख कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित आहे. राज्याच्या ऊर्जा उत्पादन क्षमतेत वाढ होण्याच्या दृष्टीने हा महत्त्वाचा प्रकल्प मानला जात असला, तरी स्थानिक नागरिकांनी पर्यावरणीय आणि सामाजिक परिणामांचा मुद्दा उपस्थित करत तीव्र विरोध दर्शवला आहे. ग्रामस्थांच्या मते, या प्रकल्पामुळे मुणगे गावासह संपूर्ण देवगड तालुका आणि सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या पर्यावरणावर गंभीर परिणाम होऊ शकतात. शेती, मत्स्यव्यवसाय, जैवविविधता आणि स्थानिकांच्या उपजीविकेवर त्याचा विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात आली. मुणगेकर ग्रामस्थ तसेच मुंबईस्थित मुणगेवासीयांच्या संयुक्त ग्रामसभेत शासनाच्या भूमिकेचा निषेध करण्यात आला. स्थानिकांना विश्वासात न घेता प्रकल्प पुढे रेटण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला.

# बंडाची तयारी महिनाभरापासून ओमराजेंच्या भावाचाच आरोप

■ धाराशिव

**खासदार** ओमराजे निंबाळकर यांनी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर त्यांचे चुलत बंधू आणि उबाठाचे धाराशिव जिल्हा सहसंपर्कप्रमुख मकरंद राजेनिंबाळकर यांनी, शिंदे गटात जाण्याचे नियोजन गेल्या महिनाभरापासून सुरू होते, अशी धक्कादायक माहिती दिली आहे.

मकरंद राजे म्हणाले की, ओमराजे यांनी पक्षांतराबाबत माझ्याबरोबर चर्चा केली होती. मात्र हा निर्णय योग्य नसल्याचे सांगत मी त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला. आपण २०२९ मध्येही निवडून येऊ शकतो, असे मी त्यांना सांगितले होते. पण त्यांनी माझे मत मान्य केले नाही. मी उद्धव ठाकरे यांच्यासोबतच राहणार असून, पक्षाने आदेश दिल्यास ओमराजे यांच्या विरोधात आंदोलन करण्यासही तयार आहोत. ओमराजे यांनी पक्ष सोडला असला तरी शिवसैनिक ठाकरे यांच्यासोबतच राहतील.

दरम्यान, २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत ओमराजे निंबाळकर यांच्या विरोधात निवडणूक लढवलेल्या जिल्हा परिषद अध्यक्षा अर्चना पाटील यांनीही त्यांच्या पक्षांतरावर प्रतिक्रिया दिली.

**फ्रान्समध्ये भीषण उष्णतेच्या लाटेने कहर केला असून, तापमानाचे सर्व जुने विक्रम मोडीत निघण्याची वेळ आली आहे. देशाच्या निम्म्या भागात म्हणजेच ५८ विभागांमध्ये हवामान विभागाने 'रेड अलर्ट'जारी केला आहे.**

# फ्रान्स-ब्रिटनमध्ये उष्णतेची लाट 'रेड अलर्ट' जारी! ५८ जणांचा मृत्यू

■ पॅरिस

**उष्णतेपासून** दिलासा मिळवण्यासाठी नागरिक नद्या व तलावांकडे धाव घेत आहेत. मात्र, गेल्या पाच दिवसांत फ्रान्समध्ये ४० जणांचा बुडून मृत्यू झाला असून, त्यात प्रामुख्याने तरुणांचा समावेश आहे, अशी माहिती फ्रान्सचे पंतप्रधान सेबॅस्टियन लेकोन्यू यांनी दिली. फ्रान्समध्ये वातानुकूलित यंत्रणांचा वापर मोठ्या प्रमाणावर नसल्याने शाळा, रेल्वे सेवा व क्रीडा स्पर्धांवर मोठा परिणाम झाला आहे. ही उष्णतेची लाट २००३ च्या भीषण लाटेची आठवण करून देत आहे,



ज्यामध्ये सुमारे १५,००० लोकांचा मृत्यू झाला होता. त्यानंतरच फ्रान्सने 'हीट वॉच' प्रणाली सुरू केली होती. इंग्लिश खाडीपलीकडे ब्रिटनमध्येही उष्णतेचा पारा चढला आहे. हवामान विभागाने रेड एक्स्ट्रीम हीटचा इशारा दिला आहे. ब्रिटनमध्ये दिवसभर तापमानाचा पारा ४० अंश सेल्सिअसच्या वर जात आहे. रात्रीही उष्णतेपासून दिलासा मिळत नसल्याने नागरिकांचे हाल होत आहेत. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते गेल्या चार वर्षांत युरोपमध्ये उष्णतेमुळे झालेल्या २ लाखांहून अधिक मृत्यूंपैकी बहुतांश मृत्यू टाळण्यासारखे होते.

# स्मार्ट मीटरचा ४० हजार कोटींचा ग्राहकांवर बोजा! नागपुरात आज मोर्चा

■ नागपूर

**राज्यात** लागू होणाऱ्या स्मार्ट प्रीपेड वीज मीटर योजनेवरून वाद चिघळला असून, या प्रकल्पाचा तब्बल ४० हजार कोटी रुपयांचा खर्च अखेरीस सामान्य ग्राहकांवर टाकला जाईल, असा आरोप नागरी संघर्ष समितीचे संयोजक मोहन शर्मा यांनी केला आहे. केंद्र सरकारच्या अनुदानाव्यतिरिक्त उर्वरित सुमारे १६ हजार कोटी रुपयांचा थेट भार जनतेवर पडणार असल्याचा दावा त्यांनी केला. या पार्श्वभूमीवर या योजनेच्या विरोधात उद्या नागपुरात महावितरण कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. या मुद्द्यावरून विधान परिषदेतही सत्ताधाऱ्यांना विरोधकांनी घेरले. काँग्रेस आमदार सतेज पाटील म्हणाले की, रेट्रोस्पेक्टिव्ह पद्धतीने (पूर्वप्रभावाने) ग्रीड चार्जेस का आकारले जात आहेत? ग्राहकांच्या मीटरऐवजी फीडर स्तरावर स्मार्ट मीटर का बसवले जात नाहीत? काँग्रेस आमदार भाई जगताप म्हणाले की, स्मार्ट मीटरमुळे ग्रामीण व शहरी भागातील ग्राहकांना वाढत्या बिलांचा फटका बसत आहे. यावर उत्तर देताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यातील १०० टक्के फीडरवर स्मार्ट मीटर बसवण्याचे काम आधीच पूर्ण झाले आहे. त्यामुळे आता 'अंदाजपंची'वर आधारित बिलिंग पूर्णपणे बंद झाले आहे.